अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ३ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

आजचा रंग
मोरपंखी

## इम्रान खान यांना अटकेसाठी ३ हजार पोलीस रवाना

सुराज्य/इस्लामाबाद : न्यायाधीश महिलेला धमकावल्या प्रकरणी पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्याविरोधात इस्लामाबादेतील न्यायालयाने अटक वॉरंट बजावले आहे. त्यामुळे आता इम्रान खान यांना अटक केली जाण्याची चिन्हे आहेत.

इम्रान खान यांना अटक करण्यासाठी इस्लामाबादचे ३ हजार पोलीस कर्मचारी इस्लामाबादचे उपनगर असलेल्या बानिगला येथील खान यांच्या निवासस्थानी रवाना झाल्याचे समजते आहे. पाकिस्तान तेहरीक ए इन्साफ पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जमा व्हायला सुरुवात केल्यानंतर अटकेच्या शक्यतेची अफवा असल्याचे पोलिसांनी सांगून वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला आहे.

# धावत्या भेटीतून दादांनी दिला धक्का म्हणाले, पुन्हा येतो... गृहपाठ करा पक्का



सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि महाराष्ट्र विधान सभेतील विरोधी पक्ष नेते अजित(दादा) पवार हे सातारा दौऱ्यावर निघताना रविवारी सकाळी काही वेळ सोलापुरात होते. या धावत्या भेटीत त्यांनी सोलापुरातील आपले विश्वासू शिलेदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष संतोष पवार यांना कानगोष्टी सांगितल्या. पक्ष बळकटीकरण आणि सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, परवाच्या मुंबईतील बैठकीत दिलेल्या अजेंड्याप्रमाणे काम करा, मी पुढच्या महिन्यात सोलापुरात येतोय, तेव्हा आढावा घेऊ या, असे सांगत पवार हे साताऱ्याच्या दिशेने मार्गस्थ झाले.**

शेजाऱ्याच्या उस्मानाबाद जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले अजित पवार तेथील दौरा उरकून, सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर जाताना रात्री सोलापुरात मुक्कामी थांबले होते. येथील शासकीय विश्रामगृहावर मुक्काम ठोकून घाईने साताऱ्याकडे निघालेल्या पवार यांनी संतोष पवार यांना काही विशेष गोष्टी सांगितल्या. सोलापुरातील समस्या सोडविण्यासंदर्भात राष्ट्रवादी पक्ष काय करू शकतो. त्याबद्दलची माहिती संकलित करणे, शहरातील प्रत्येक प्रभागात बैठका लावण्याचे नियोजन करणे, अल्पसंख्याक वा इतर समाजाचे मेळावे सोलापुरातील विधानसभेच्या तिन्ही मतदार संघात घेण्याचे धोरण हा सांगितलेला गृहपाठ पक्का करा, मी पुढील महिन्यात सोलापूर दौऱ्यावर येतोय, तेव्हा आढावा घेऊ या, असे सांगत पवार साताऱ्याच्या दिशेने मार्गस्थ झाले.

### सोलापुरात अचानक मुक्काम

अजितदादा यांचा शनिवारचा मुक्काम तसा बारामतीत नियोजित होता, पण उमरगा येथील कार्यक्रम संपायला खूप उशीर झाला. रात्री उशिराचा बारामतीपर्यंतचा प्रवास त्यांनी टाळला. सोलापूरहून साताऱ्याला जिल्ह्याच्या दौऱ्यावर जाण्याचा शॉर्टकट काढला. त्यातून त्यांनी सोलापुरात मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. येथील मुक्कामाचा त्यांचा निर्णय अचानक होता. त्यामुळे राष्ट्रवादीवाल्यांना पवारांच्या मुक्कामाबद्दलची माहिती नव्हती. जेव्हा कधी सकाळी माहिती झाली, तोपर्यंत अजितदादा सोलापूर सोडून साताऱ्याकडे मार्गस्थ झाले होते.

### शासकीय विश्रामगृहात नो एंट्री

रविवारी रात्री उशिरा अजित पवार यांचा फौजफाटा सोलापूरच्या शासकीय विश्रामगृहात डेरेदाखल झाला. उस्मानाबाद दौऱ्यासाठी रविवारी पहाटे उठणे, प्रवास तसेच दिवसभरातील कार्यक्रम यामुळे थकलेल्या अजित पवारांनी कोणासही भेटण्यास सोडू नये, असे फर्मान सोडले होते. त्यामुळे रविवारी रात्री अजित पवार यांनी सोलापूरचे कोणी भेटले नाही. पवारांना भेटण्याला शासकीय विश्रामगृहात नो एंट्री होती.

### सकाळी गांधीजींना अभिवादन

साताऱ्याकडे जाण्याच्या घाईगडबडीत असलेल्या अजित पवार यांनी त्यातूनही खास वेळ काढत सोलापुरातील रेल्वे स्थानक परिसरातील महात्मा गांधी यांच्या पुतण्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी त्यांच्यासोबत संतोष पवार यांच्यासह अत्यंत निवडक कार्यकर्ते होते.

### वक्तशीरपणाचा अन् शिस्तप्रियतेचा पुनर्प्रत्यय

अजित पवारांच्या वक्तशीरपणाचा आणि शिस्तप्रियतेचा प्रत्यय तसा उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. तसाच प्रत्यय रविवारी सोलापुरात त्यांच्याबाबतीत आला. उमरग्याहून रात्री उशिरा सोलापुरात पोहचलेले पवार हे नेहमीप्रमाणे पहाटे लवकर उठले. शासकिय विश्रामगृहात पहाटे सव्वा पाच वाजता पवार हे सोलापुरातील दैनिके पहात होते. साडेसहा वाजता तयार होऊन त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करत सातारा जिल्ह्यातील माण तालुक्याच्या दिशेने प्रस्थान ठेवले.

### पवार भेटले केवळ पवारांनाच

राष्ट्रवादीचे नेते संतोष पवार हे अजितदादांचे सोलापुरातील अत्यंत विश्वासू शिलेदार आहेत. अजितदादांच्या आजच्या दौऱ्यातदेखील त्यांचा पुन्हा प्रत्यय आला. सोलापुरातील राष्ट्रवादीच्या कोणालाही न भेटता, अजितदादा केवळ संतोष पवार या आपल्या विश्वासू शिलेदाराला भेटले. पहाटेच संतोष पवार हे शासकिय विश्रामगृहावर पवारांच्या स्वागतासाठी पोहचले. स्वागतानंतर पवार यांनी शिलेदार संतोष पवार यांच्याकडे काही गोष्टी सांगितल्या. महात्मा गांधी यांच्या अभिवादनाला जाताना अजित पवार यांच्यासमवेत सोलापूरचे संतोष पवार हेच एकमेव होते.

## भारताचा द. आफ्रिकेवर १६ धावांनी विजय

सुराज्य/गुवाहाटी

भारत व दक्षिण आफ्रिका यांच्या दरम्यानचा दुसरा टी२० सामना गुवाहाटी येथे सुरू झाला. मोठ्या धावसंख्येच्या झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने २३७ धावा उभारलेल्या. याचा पाठलाग करताना डेव्हिड मिलर व क्विंटन डी कॉक यांनी शानदार फलंदाजी केली. डेव्हिड मिलरने शानदार अर्धशतक केले मात्र त्याची ही झुंज अपयशी ठरली. धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेली दक्षिण आफ्रिकेची सुरुवात खराब झाली. कर्णधार टेम्बा बावुमा आणि रिले रॉसो यांना भोपळाही फोडता आला नाही. मात्र, तरीही भारतीय संघाने १६ धावांनी विजय



मिळवत मालिका आपल्या खिशात घातली. यासोबतच भारतीय संघाने प्रथमच मायदेशात दक्षिण आफ्रिकेला मालिकेत पराभूत केले. केएल राहुल याला सामनावीराचा किताब देण्यात आला.

तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या टी२० सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताचे सलामीवीर रोहित शर्मा आणि केएल राहुल यांनी पहिल्या सहा षटकात आक्रमक सुरूवात केली.पहिल्या दहा षटकात भारतीय संघ १०० धावा फलकावर लावणार तेवढ्यात कर्णधार रोहित शर्मा बाद झाला. त्याने ३७ चेंडूत ४३ धावा केल्या. त्यातील निम्म्या धावा या चौकार आणि षटकार यांनीच केल्या आहेत. एडन मार्कराम दुसऱ्या चेंडूवर षटकार खेचत केएल राहुलचे अर्धशतक साजरे केले. त्याने २७ चेंडूत ५७ धावा केल्या. अर्धशतक होताच केएल राहुल बाद झाला. गुवाहाटीमध्ये सुर्यकुमार यादवची त्सुनामी आली होती. त्याने त्याचा फॉर्म पुढे सुरु ठेवत अर्धशतक पूर्ण केले. जवळपास निम्म्यापेक्षा कमी चेंडूत त्याने ते पूर्ण केले. १८चेंडूत ५४ धावा केल्या. त्याच बरोबर भारताने २०० धावा पूर्ण केल्या. दोघांमध्ये १०२ धावांची भागीदारी झाली आहे.

## तुळजापूर रोडवर भीषण अपघात; दोघे जागीच ठार



सुराज्य/सोलापूर

देवीचे दर्शन घेऊन तुळजापूर रोड वरून सोलापूरच्या दिशेने जात असताना दोघा युवकांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली.

शनिवारी सायंकाळच्या सुमारास एसटीने मोटरसायकलीला पाठीमागून धडक दिल्याने आई व बहिणीला दर्शनासाठी घेऊन जाणारा एक १५ वर्षांचा महाविद्यालयीन युवक जागीच ठार झाला. ही घटना ताजी असतानाच आज पुन्हा त्याच रोडवर तळे हिप्परगा नजीक मेजर साब धाबाच्या समोर भीषण अपघात झाला.

दुचाकी व मालवाहतूक हायवा टिपरच्या भीषण अपघातात दुचाकी वरील दोघे युवक जागीच ठार झाले. ही घटना सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. हा अपघात एवढा भीषण होता की दोघे उडून एकमेकापासून दूर-दूर रक्ताच्या थारोळ्यात अस्ताव्यस्त पडले होते. तर मोटर सायकल दुसरीकडे पडली होती. डोक्यांची कवटी फुटून मेंदू बाहेर आले होते. काळीज हेलावून टाकणारी हे भीषण दृश्य पाहण्याकरिता एकच गर्दी झाली होती.

एम. एच. १३. डी. क्यू. ४०१० ही अशोक लेलँड मालवाहतूक हायवा तुळजापूरकडून सोलापूरच्या दिशेने येत होती. तर एम. एच. १३. डी. एच. ००३४ या दुचाकी वाहनावरून रवींद्र नागनाथ अलशेट्टी (वय-२२) व व्यंकटसाई सूर्यप्रकाश कत्ती (वय-२४, दोघे रा. नवीन विडी कुंभारी, सोलापूर) असे या अपघातात ठार झालेल्या युवकांची नावे आहेत. हे दोघे युवक तुळजापूर कडून देवीचे दर्शन घेऊन सोलापूरच्या दिशेने वेगाने निघाले होते. मेजर साब धाबा समोर ते अचानक या मालवाहतूक ट्रिपर गाडीच्या आडवे आले. त्यामुळे या गाडीची दुचाकीस मागून जोराची धडक बसली. आणि या धडकेत ते दोघेही मोटरसायकल वरून रस्त्यावर पडले होते डोके फुटून मेंदू बाहेर आला होता. सोबतचे साहित्य रस्त्यावर विखुरले होते. या अपघाताची माहिती तालुका पोलीस ठाण्याला देण्यात आली. तालुका पोलीस ठाण्याचे एपीआय राठोड व त्यांचे पथक त्या ठिकाणी तात्काळ पोहोचले. मृतदेह लादेन यांच्या ॲम्बुलन्स मध्ये घालून शवविच्छेदनासाठी शासकिय रुग्णालयाकडे रवाना करण्यात आले. यावेळी बराच वेळ वाहतूक विस्कळीत झाली होती. अपघात झाल्याने नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. पोलिसांनी येऊन वाहतूक सुरळीत केली. शासकीय रुग्णालय सुध्दा नातेवाईकांनी व मित्रमंडळीने एकच गर्दी केली होती.

## मुख्यमंत्र्यांना जीवे मारण्याचा कट रचल्याची खोटी माहिती देणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

सुराज्य/मुंबई

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याचा कट रचल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षास मिळाली होती. तेव्हापासून मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह त्यांच्या घराबाहेरील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली होती. मात्र मुख्यमंत्री शिंदेंना जीवे मारण्याचा कट रचल्याची माहिती खोटी असल्याचे समोर आले असून याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

खोटी माहिती देणाऱ्या या व्यक्तीविरोधात लोणावळा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अविनाश अप्पा वाघमारे ((वय-३६, रा. रमाबाई आंबेडकर नगर, साठे चाळ, घाटकोपर, मुंबई) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी लोणावळा शहर पोलीस कॉन्स्टेबल अक्षय वायदंडे यांनी फिर्याद दिली आहे.



लोणवळा शहर पोलिसांच्या माहितीनुसार, आरोप अविनाश वाघमारे याचे आज (२ ऑक्टोबर) दुपारी २. ४५ च्या सुमारास पुणे मुंबई राष्ट्रीय महामार्गालगतच्या वळवन येथील हॉटेल साई कृपा (एनएच ४) येथील मॅनेजर किशोर पाटीलसोबत वाद झाला होता. पाण्याच्या बाटलीची किंमत जास्त लावल्यावरून हा वाद झाला होता. यावेळी हॉटेल मॅनेजर आणि कर्मचाऱ्यावरील राग मनात धरून त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने आरोपी अविशाने आपल्या मोबाईलवरून पोलीस नियंत्रण कक्षास १०० नंबरवर कॉल केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याचा प्लॅन चालू असल्याची खोटी माहिती दिली.

## पवारांनंतर राहुल गांधींचे मुसळधार पावसात भाषण

सुराज्य/म्हैसूर : राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी २०१९ साली साताऱ्यात मुसळधार पावसात केलेल्या भाषणाच्या आठवणी आजही ताज्या आहेत. २०१९ मधील लोकसभेच्या पोटनिवडणुकीआधी पवारांनी धो-धो पावसात राष्ट्रवादीचे उमेदवार श्रीनिवास पाटील यांना निवडून आणण्याची साद मतदारांना घातली होती. त्यानंतर जे घडलं ते अवघ्या महाराष्ट्रानं अनुभवलं. या घटनेच्या तीन वर्षांनंतर काँग्रेस खासदार राहुल गांधींनी मुसळधार बरसणारा पाऊस अंगावर झेलत कर्नाटकाच्या म्हैसुरमध्ये भाषण केलं. त्यांच्या या सभेचा व्हिडिओ काँग्रेसने ट्विटरवर पोस्ट केला आहे.

कुठलाही अडथळा भारत जोडो' यात्रेला लक्ष्य प्राप्तीपासून रोखू शकत नाही, असे कॅप्शन या पोस्टला देण्यात आले आहे. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसची भारत जोडो' यात्रा सुरू आहे. कन्याकुमारीतून सुरू झालेल्या या यात्रेचा मुक्काम सध्या कर्नाटकात आहे. भारताला एकजूट करण्यापासून आम्हाला कोणीही रोखू शकत नाही. भारताचा आवाज उठवण्यापासून आम्हाला कोणीही थांबवू शकत नाही, असा संदेश या पोस्टद्वारे काँग्रेसने दिला आहे.

### तिसरा डोळा


– प्रकाश पोरे



'लोन ॲप'ची आयडिया कोणाची होती?

## अक्कलकोट वगळता सर्व १० तालुक्यांत लम्पी पसरला

### २१ पशुधनांचा मृत्यू; २७६ पशुधनांना बाधा



सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात लम्पी आजाराची व्याप्ती वाढली आहे अक्कलकोट तालुका वगळता सर्व १० तालुक्यात लम्पीने विळखा घातला आहे. यामुळे आता लम्पी आजाराने आत्तापर्यंत २१ जनावरांचा मृत्यू झाला आहे. सलग दोन दिवस शुक्रवार आणि शनिवारी प्रत्येकी चार जणांचा मृत्यू झाला आहे. प्रशासनाने लसी करणावर भर दिला आहे. तरी देखील जिल्ह्यात २७६ रुग्ण ॲक्टिव्ह आहेत. ५ रूग्णाची प्रकृती क्रिटिकल आहे

जिल्ह्यात लम्पी आजाराने आतापर्यंत २१ जनावरांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये २१ गाई तीन गाईची वासरे आणि सात बैलांचा समावेश आहे. शनिवारी करमाळा तालुक्यातील करमाळा शहर येथे १ खिल्लार गाय, तसेच दिवेगव्हाण आणि राजुरी येथील प्रत्येकी एक गाईची वासरे तर माळशिरस तालुक्यातील बांगरडे येतील एका गाईच्या वासराचा मृत्यू झाला. शनिवारी दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील एका गाईचा रिपोर्ट बाधित आल्यामुळे बाधित तालुक्याची संख्या १० झाली आहे. अक्कलकोट तालुक्यात एकही बाधित जनावर नाही.

जिल्ह्यातील अक्कलकोट तालुका सोडून इतर दहा तालुक्यातील ४६ गावे बाधित झाले आहेत. जिल्ह्यामध्ये ७४५४०४ एकूण गोवंश पशुधन आहे. तर बाधित क्षेत्रातील गायवर्ग जनावराची संख्या १ लाख ८८ हजार ४६१ आहे. या पैकी बाधित क्षेत्रातील ४४१ पशू लागण झाली आहे. त्यापैकी १४४ पशू उपचारामुळे बरे झाले आहेत. आज आज अखेर जिल्ह्यामध्ये २७६ लम्पी आजाराचे ॲक्टीव्ह आहेत. ज्या भागात लम्पी पसरला आहे. जिल्हा आत्तापर्यंत ५ ३०१४३ एकूण लसीकरण झाले आहे. तर बाधित क्षेत्र आता पर्यंत १, लाख ६८ हजार १७० क्षेत्र लसीकरण झाले आहे. तर ६७ ३२१ खाजगी लसीकरण झाले आहे. ५३१५०० एकूण लस मात्रा प्राप्त झाल्या होत्या. सध्या ६८६७८ उपलब्ध लस आहे. यासाठी १७२ लसीकरण टिम काम करत आहेत. साठी १० कॉलेज विद्यार्थ्यांची मदत घेतली जात आहे तर अत्यवस्थ पशू पाहण्यासाठी चार पशू वैद्यकीय तज्ज्ञ नियुक्त करण्यात आले आहेत.

# काँग्रेसमधील गोंधळ

काँग्रेस पक्षाध्यक्ष निवडीवरून पक्षात सध्या घमासान सुरू आहे. गांधी घराण्याला सोडून इतर नेत्याला हे पद देण्याचे पक्षाचे नवे धोरण आहे.त्यानुसार ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांची निवड होणार,असे दिसते.एकमात्र माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या काही उलटसुलट विधानांमुळे ते बंडखोर ठरणार की काय? हा एक नवा प्रश्न समोर आला आहे. अखिल भारतीय स्तरावर काँग्रेसमध्ये होणाऱ्या पुनर्रचनेनंतर राज्यातील कोणत्या नेत्याला पक्ष संघटनेत महत्त्वाची जबाबदारी मिळते याकडे नेतेमंडळी आणि कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. चव्हाण यांची दिल्लीत काम करण्याची इच्छा असली तरी पक्ष नेतृत्व कोणता निर्णय घेते यावर सारे अवलंबून असेल. खरगे यांची निवड होणार हे निश्चित. त्यानंतर पक्षाची कार्यकारी समिती, सरचिटणीस, राज्य प्रभारी व अन्य पदाधिकाऱ्यांच्या नव्याने नियुक्त्या होण्याची चिन्हे आहेत. यात महाराष्ट्रातील कोणत्या नेत्याकडे महत्त्वाची जबाबदारी सोपविली जाते याची पक्षाच्या कार्यकर्त्यांना आत्तापासूनच उत्सुकता आहे. पक्ष संघटनेत राज्यातील मुकुल वासनिक हे वर्षानुवर्षे ठाण मांडून बसले आहेत. खासदारकी, केंद्रात मंत्रिपद, सरचिटणीस अशी अनेक पदे त्यांनी भूषविली. पण तळागाळात काहीच जनाधार नाही, अशी त्यांची अवस्था. रामटेक मतदारसंघातून निवडून येणे त्यांना कठीण. कायम दिल्लीत दरबारी राजकारण करण्यावरच त्यांचा भर राहिला. काँग्रेस अध्यक्षपदासाठीही त्यांचे नाव चर्चेत आले होते. दलित समाजातील नेता म्हणून अ. भा. काँग्रेसमध्ये त्यांना महत्त्व मिळत गेले. काँग्रेस अध्यक्षपदी निवड होणारे हे खरगे हे दलित समाजातील नेते आहेत. यामुळे वासनिक यांचे महत्त्व आपसूकच कमी होईल, असे मानले जाते. महाराष्ट्रातून चव्हाण हे राष्ट्रीय पातळीवर काम करण्यास इच्छुक आहेत. यापूर्वी त्यांनी २० वर्षे दिल्लीत काम केले आहे. पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री तसेच पक्षात सरचिटणीसपद ही दोन महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली आहेत. पण पक्षातील बदलत्या रचनेत त्यांचे महत्त्व कमी होत गेले. राज्यातील अन्य नेत्यांचे त्यांना पूर्ण समर्थन नाही. ही बाब त्यांच्यासाठी प्रतिकूल ठरू शकते. अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, रजनी पाटील आदी संघटनेतील नेते आहेत. रजनी पाटील या राज्यसभा खासदार आणि राज्याच्या प्रभारी आहेत. अशोक चव्हाण वा बाळासाहेब थोरात यांची पसंती दिल्लीपेक्षा राज्यात काम करण्यात अधिक आहे. नागपूरचे अविनाश पांडे हे माजी सरचिटणीस आणि झारखंडचे प्रभारी आहेत. पण राज्याच्या राजकारणाशी त्यांचा फार काही संबंध आलेला नाही. संजय दत्त हे हिमाचलचे सहप्रभारी आहेत. त्यांचीही राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाच्या पदावर काम करण्याची इच्छा आहे. राजीव सातव यांनी दिल्लीत अल्प कालावधीत जम बसविला होता पण कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत त्यांचा मृत्यू झाला. राज्यातून त्यांची जागा घेईल, असे तरुण नेतृत्व अद्याप तरी पुढे आलेले नाही. अमित देशमुख, मिलिंद देवरा, प्रतीक पाटील, वर्षा गायकवाड, प्रणिती शिंदे, यशोमती ठाकूर, हर्षवर्धन सकपाळ, पृथ्वीराज साठ्ये, सचिन नाईक, बाजीराव खाडे आदी तरुण पिढीतील नेत्यांना पक्षाने राष्ट्रीय पातळीवर सचिव किंवा अन्य जबाबदारी सोपविली होती. पण स्वतःची छाप पाडण्यात हे तरुण किंवा दुसऱ्या पिढीतील नेते तेवढे अजून तरी यशस्वी झालेले नाहीत. पक्ष संघटनेत काम करीत असले तरी स्थानिक पातळीवर किंवा राष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कार्याची छाप अजून तरी पडलेली दिसत नाही. काँग्रेस अध्यक्षपदी राहुल गांधी यांची बिनविरोध निवड करण्यास पृथ्वीराज चव्हाण यांनी विरोध दर्शवला होता. राहुल यांची काँग्रेस अध्यक्षपदी बिनविरोध निवड व्हावी, असा प्रस्ताव महाराष्ट्र काँग्रेसच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी तो मांडला होता, त्याला बैठकीत उपस्थित सर्वांनी पाठिंबा दिला, मात्र पृथ्वीराज चव्हाण यांनी हात वर केला नसल्याची माहिती आहे.काँग्रेस हायकमांडला पत्र लिहिणाऱ्या २३ नेत्यांपैकी पृथ्वीराज चव्हाण हे एक आहेत. काँग्रेस पक्षाला पूर्णवेळ अध्यक्ष मिळावा, ही या नेत्यांची प्रमुख मागणी आहे.काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यासाठी तयार करण्याची शक्यता आहे. राहुल गांधी सध्या भारत जोडो यात्रेवर आहेत.अध्यक्षपदाच्या वेळी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी पक्षावर दबाव टाकण्याचा उद्योग केला होता.त्यांना अध्यक्ष व्हायचेच नव्हते.मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीची ऊब त्यांना अजूनही हवी आहे.आमदारांच्या राजीनाम्याचे नाट्य पुढे करून श्रेष्ठींना पेचात आणण्याचे काम त्यांनी केले होते.राहुल यांची भारत जोडो यात्रा संपल्यानंतर चव्हाण व गेहलोत यांचा फैसला होईल, असे दिसते.



राजकीय

# उदंड झाले गट आणि रिपब्लिकन पक्ष

**विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील पक्ष म्हणून 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' चा उल्लेख केला जातो पण त्यांच्या पश्चात अनेक गटातटात हा पक्ष दुभंगला गेला. अनेक वेळा एकीकरणाचे प्रयोगही झाले मात्र, ते क्षणिक ठरले पण असे असले तरी या पक्षाने दलित चळवळीला नेहमीच उभारी दिली आहे. उदंड गट असले तरी 'भीम विचारधारा' या गटांनी सोडली नाही हे विशेष. त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा वर्धापन दिन साजरा करत असताना या पक्षाचे समाजासाठी राहिलेले योगदान, याचे प्रत्येकाने चिंतन करणे गरजेचे बनले आहे.**

१३ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील धम्मदीक्षेच्या समारंभ प्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी व्यापक पाया असलेल्या नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष असे या पक्षाचे नाव असेल व स्वातंत्र्य समता आणि बंधुता या तत्त्वत्रयीवर आधारलेला हा राजकीय पक्ष असेल.१९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी हा पक्ष अस्तित्वात येईल. हा पक्ष सर्वांसाठी खुला असेल असे डॉ. आंबेडकरांनी जाहीर केले होते. तत्कालीन काँग्रेसचे नेतेमंडळी काही दलित नेत्यांना हाताशी धरून राखीव जागांवर त्यांना निवडून आणत होते.त्यामुळे काही दलित नेतेमंडळी मोहापाई काँग्रेसकडे झुकताना दिसत होती व यामुळे दलितांच्या राजकीय चळवळीचा व्यापक पाया मजबूत होताना दिसत नव्हता. समाजप्रिय असणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना यामुळे संधी मिळताना दिसत नव्हती. यासाठी काँग्रेसला पर्यायी असा व्यापक आणि सर्वसमावेशक राजकीय पक्ष निर्माण होणे ही अस्पृश्य वर्गाच्या हिताच्या दृष्टीने तातडीची गरज होती. या विचारातूनच दलित वर्गाच्या उन्नतीसाठी डॉ आंबेडकरांना एका राजकीय पक्षाची गरज वाटू लागली होती. त्यासाठी त्यांनी प्रयत्नही सुरू केले होते पण त्यांच्या हयातीत त्यांचे हे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

४ डिसेंबर १९५६ रोजी सायंकाळी त्यांनी दोन महत्त्वाची पत्रे त्यांचे खाजगी सचिव नानकचंद रट्टू यांना लिहिण्यास सांगितली. त्यापैकी एक आचार्य प्र. के. अत्रे आणि दुसरे समाजवादी नेते एस. एम. जोशी यांना होते हे दोघेही काँग्रेसच्या विरोधी पक्षातील प्रमुख महाराष्ट्रीयन नेते होते आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील आघाडीचे नेते होते या दोघांनी ते काढत असलेल्या रिपब्लिकन पक्षाला येऊन मिळावे, अशी त्यांना आंबेडकरांनी या पत्रात विनंती केलेली होती. पण ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले आणि त्यानंतर दहा महिन्यांनी दि. ३ ऑक्टोबर १९५७ ला शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून रिपब्लिकन पक्षाची अधिकृत स्थापना करण्यात आली. सात लाख लोकांच्या उपस्थितीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली.



देशातली नव्हे तर जगातील ती एक अभूतपूर्व घटना होती. कारण एका राजकीय पक्षाच्या स्थापनेसाठी सात लाख लोकांनी उपस्थित राहण्याचा हा विक्रम होता. भारतात दि. २८ डिसेंबर १८८५ रोजी इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना मुंबईत झाली. त्याला केवळ ७२ लोक उपस्थित होते आणि त्यापैकी प्रामुख्याने इंग्रज अधिकारीच जास्त होते म्हणजे आपल्याच भवितव्याशी निगडित असलेले लाखो लोक पक्ष स्थापनेसाठी उपस्थित राहणे हा अपूर्व आणि अजब प्रकार होता जगाच्या इतिहासात याला तोड नाही. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पहिले अध्यक्ष म्हणून शेकाफेचे माजी अध्यक्ष एन शिवराज यांची निवड करण्यात आली. अधिवेशनाचे अध्यक्ष बॅ. खोब्रागडे यांनी एन. शिवराज यांना सन्मानाने अध्यक्षपदी बसवले तेव्हा सात लाख लोकांनी उभे राहून त्यांना एक प्रकारे मानवंदना दिली. त्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. पण बरोबर एका वर्षानंतर अंतर्गत दुहिमुळे म्हणजेच ३ आक्टोबर १९५८ ला रिपब्लिकन पक्ष फुटला गेला आणि तद्नंतरच्या काळापासून ते आत्तापर्यंत या पक्षाची काही काळापूरती एकता झाली असेलही पण हा पक्ष पूर्ण क्षमतेने एकता करू शकला नाही. अनेक गटातटात हा पक्ष विखुरला गेला.

१९५७ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीतील रिपब्लिकन पक्षाचे यश हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या कालखंडातील स्वतंत्र मजूर पक्षाच्या यशाची आठवण करून देणारे ठरले. हा पक्षाचा इतिहास असला तरी रिपब्लिकन चळवळीने समस्त दलित चळवळीत स्वाभिमान निर्माण केला. विविध गट तट अजूनही कार्यरत असले तरी सर्वांचे भीम विचारधारा हेच बलस्थान आहे. पण फुटिमुळे राजकीय, सामाजिक जे नुकसान झाले आहे ते कधीच भरून काढता येणार नाही. कारण सत्तेशिवाय निर्णय घेता येत नसतात आणि याच सत्तेपासून नेहमीच रिपब्लिकनला दूर ठेवण्याचा प्रयत्न झालेला आहे. अनेकजण उठतात आणि गट स्थापन करून मर्यादित क्षेत्रा पुरता संकुचित विचार करून डबक्यातील जीवन जगतात पण दिल्ली गाठायची असेल तर एकतेशिवाय पर्याय नाही. सर्व गट एकत्रित झाले तर रिपब्लिकन पक्ष कुठल्या कुठे जाईल याचा अंदाज करून चालणार नाही. प्रस्थापित मंडळी ठराविक लोकांच्या गळ्यात पदाची माळ अडकवणार आणि त्याचीच जाहिरात सर्वत्र करून आम्ही दलितांना सामावून घेत असल्याच्या पिपाण्या वाजवणार. हेच चालत आले आहे आणि असेच चालत राहिले तर सत्ताधारी जमात बनण्याचे स्वप्न कधीच पूर्ण होऊ शकणार नाही. ज्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाची संकल्पना मांडली त्या दिशेने जाणेच सत्तेकडील आगेकूच ठरणार आहे. f

रपब्लिकन पक्षाचा आज वर्धापन दिन आहे. किमान असंख्य गटांनी या दिवशी तरी एकत्रित येऊन समाज मंथन करणे गरजेचे वाटते. या दिवशीही दुर्दैवाने वेगवेगळे कार्यक्रम, त्यामुळे समाजमनात या पक्षाविषयी प्रेम आहे पण या नेत्यांमुळे पक्षापासून लोक दूर जाताना दिसत आहेत. धोरणात्मक बांधणीने या पक्षाला भविष्यात पुढे यावे लागणार आहे, हे मात्र नक्की.

**- डी. एस. गायकवाड, अकलूज.**

टुडेज ब्लॉग

# सौंदर्यभावना सर्वांचे ठायी


**सौंदर्यभावना विशिष्टांच्याच ठायी असते; हा अपसमज पसरवून विशिष्टांनी उर्वरित मानव समूहाला अवमानित केले आहे. सौंदर्यभावना बीज रूपाने सर्वांच्याच ठायी आहे, फक्त त्या बिजाची नीट मशागत व्हायला हवी. नीट मशागत झाली की ते बीज अंकुरतं, त्याचा फुलोरा बहरून येतो; परंतु प्रातिभ बीज स्वतःत असूनही प्रयोगात नसेल तर मग तिथेच विरून जातं; परंतु जे आपल्या या अद्भूत अशा प्रातिभबिजाची निगा राखतात ते त्याकडून सौंदर्यसंवेदना पावतात.**

प्रतिभा ही दैवी देणगी वगैरे काहीही नाही. ती मानव प्राण्यात जिनोमधून प्रवासत असते. या प्रवासात ती काहींची विस्मृत होते, तर काहींची सस्मृत असते, हेच पूर्वसंचित म्हणून पूर्वसुरींनी गौरविले आहे. एक लक्षात घ्यावे, विस्मृतीला अथक साधना प्राप्त झाली की हरवलेले प्रतिभा सामर्थ्य पुन्हा प्राप्त होऊ शकते. या प्रातिभशक्तीमुळे कुणीही प्रयत्नरत माणूस हवे तसे स्वतःला घडवू शकतो. (उदा. शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, जननेता, कवी-कलावंत आणि संतसुद्धा) प्रातिभा, समृद्ध इसमाला लोक देवाची देणगी प्राप्त भाग्यवंत समजतात. मग उर्वरित लोकांवर देवाचा कोप झालाय असे समजावे काय? हा भ्रम ज्यांनी प्रस्थापित केला, त्यांनी अनाकलनाने किंवा हेतूपूर्वक हा प्रमाद केला आहे. देव-दैवापायी माणूस प्रयत्नवंचित राहिलाय हे नाकारता येत नाही.

'प्रयत्नांती परमेश्वर' हा मुद्दा मान्य केला तर परमेश्वर फक्त विशिष्टांचाच आहे हे सूत्र नापास होते. असो!

सौंदर्यशास्त्री बा. सी. मर्ढेकरांनी सौंदर्यभावनेविषयी भाष्य करताना मेंदूला येणाऱ्या तीन प्रकारच्या संगतीचा संदर्भ दिला आहे. त्यांच्या मते, मेंदू तीन प्रकारच्या संगती लावू शकतो. एक मानसशास्त्रीय, दुसरी तर्कशास्त्रीय आणि तिसरी सौंदर्यात्मक. पुढे ते म्हणतात, 'वाघाचे दृश्य घेऊ या. वाघ बघितल्यावर बघणाऱ्याला सर्कसची आठवण येईल; त्यावरून त्या विदूषकाचे काम करणाऱ्या मनुष्याच्या खासगी जीवनाबद्दल कल्पना सुचतील; त्यावरून मानव म्हणजे जगाच्या रंगभूमीवरचा विदूषक नव्हे का, असा विचार सुचेल.' सुप्तासुप्त संज्ञाशक्तीतले हे सर्व प्रवाह दिसायला एखादे वेळेस असंबद्धही दिसतील; पण त्यातही एक प्रकारची संगती असते. ही मानसशास्त्रीय संगती. याच्यानंतर, वाघ हा हिंस्र प्राणी आहे आणि त्याने आपणावर झडप घातली तर आपला निकाल लागेल, तेव्हा आपण धूम ठोकली पाहिजे; ही तर्कशास्त्रीय संगती. शेवटी, वाघाचा पिवळा रंग व त्यावरील काळे पट्टे एकमेकांना कसे खुलवतात, त्याच्या पाठीची वक्ररेषा आणि शेपटीची वक्ररेषा यांचे परस्परांना परिपोषक असे वर्तन, ही सौंदर्यात्मक संगती.'

या तिन्ही संगती परस्परांच्या नातलग आहेत याबद्दल वाद नाही. मर्ढेकरांनी तर्कशास्त्रीय संगतीत वाघ माणसाचा फडशा पाडतो, तो माणसाची शिकार करतो या आशयाचे तर्क व्यक्त केले आहेत; ते खरे आहेत; पण या तिन्ही संगतींचा विचार करताना आधी जैविक भावनेचा विचार करायला हवा. जैविक भावना सुरक्षित असेल तरच आपण वाघ आणि



त्याच्या लिळांचा सौंदर्यात्मक आस्वाद घेऊ शकतो. तो सर्कसमधील वाघ असेल, तर जैविकसुरक्षा अधिक वाटते; पण तो पिंजऱ्यातून बाहेर पडायची शक्यता जाणवताच सारे प्रेक्षक जिवाच्या भयाने भयग्रस्त होत सर्कस सोडून भराभर बाहेर पडतील, हे सांगणे न लगे. म्हणूनच जैविकभावना प्रधान असून सौंदर्यभावना दुय्यम ठरते. जैविकभावना ही जीवन आहे, तर सौंदर्यभावना जीवन अधिक सुंदर करण्याचे सूत्र आहे.


गवयाचेच मूल कोमल निषादात रडते काय? हा प्रश्न अस्वस्थ करतोय. भारतीय शास्त्रीय संगीतात निषादाचे दोन प्रकार सांगितले आहेत. कोमल निषाद आणि शुद्ध निषाद आणि ते गवयाचे मूल असल्यामुळे त्या रडण्यालाही कोमल निषादाचे भान असते काय? मुळात मूल कोणाही आईचे असो, मग गायिका असो वा नाटकात दुष्ट खलनायिकेची भूमिका करणारी स्त्रीमधली आई असो, तिचे भुकेने व्याकुळलेले मूल रडायला लागले की, तिला प्रथम वात्सल्याने दुथडी भरलेला पान्हाच फुटेल. मग त्याचे रडणे कुठल्या निषादात मोडते वगैरे नंतर. सौंदर्य म्हणजे नेमके काय? सौंदर्य म्हणजे चित्ताला लाभणारा आल्हाद. वाङ्मय कलाकृतीबद्दल बोलायचे झाल्यास वाचकाला बोधात नेणे ही वाङ्मयकृतीच्या गुणवैशिष्ट्याची एक बाजू, तर आल्हादानंद निर्माण करणे ही दुसरी बाजू. आल्हाद सावलीच्या सुखासारखाही असतो. वृक्ष काटेरी असो वा विषारी-अविषारी, त्याच्या सावलीचा गुणधर्म शीतलताच. म्हणून माणसानं एकदा तरी स्वतःच्या सावलीशी संवाद करावा; खात्रीने सांगतोय, अंतःकरण आल्हादित होईल; उन्हात भिजणाऱ्या सावलीसारखं. आल्हाद म्हणजेच आनंद.

संस्कृत साहित्यिक मम्मटाने म्हटलेय की, कवीची निर्मिती केवलानंदमयी असते; परंतु ज्ञानेश्वरादी संतांनी आनंदप्राप्ती प्रयोजनाला गौण मानले. कदाचित कलेपासूनची आनंद वा आल्हादप्राप्ती त्यांना मनोरंजनपर वाटली असावी. आल्हादानंदाने रसिकाला मनोविश्रांतस्थिती अनुभवता येते. कलेपासून मिळणारा बोधही आनंद रूपात सिद्ध होतो. हा आनंद सौंदर्यात्मकही असतो आणि हाच शिवम आणि सत्यमही असतो. या महाविश्वात सत्याइतुके अन्य दुसरे काही सुंदर नाही; पण सत्य कटू असते काय? नाही; सत्य फक्त सत्य असते आणि ते अंतर्मनाचे प्राणसत्त्व असते.

**- सुधाकर गायधनी.**

बोधकथा

## बढाईखोर माणूस




एक माणूस फार वर्षे प्रवास करून आपल्या घरी आला व आपण परदेशात असताना काय मौजा पाहिल्या हे त्याने आपल्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांना तिखट मीठ लावून सांगितले आणि अगदी शेवटी एक थाप ठोकून दिली की, 'मी अलकावतीला गेलो असता तेथील लोक पंधरा पंधरा हात उंच उड्या मारतात पण त्यांनी माझ्याशी पैज लावली असता माझ्याइतकी उंच उडी एकालाही मारता आली नाही.' तिथे ऐकणाऱ्यांपैकी कोणालाही ही गोष्ट खरी वाटली नाही. तेव्हा त्यांची खात्री करण्यासाठी तो नाना प्रकारच्या शपथा घेऊ लागला. त्यावेळी त्या लोकातील एक माणूस त्याला म्हणाला, 'अहो, अशा शपथा कशाला घेता? हातच्या कंकणाला आरसा कशाला? यावेळी तुम्ही अलकावतीला आहात असे समजून तिथे जशी उडी मारली तशी इथेही मारून दाखवा म्हणजे झाले' हे ऐकताच त्या बढाईखोर माणसाचे तोंड ताबडतोब बंद झाले.

**तात्पर्य - आपण प्रवासात पाहिलेल्या गोष्टी फुगवून सांगण्याची काही लोकांना सवय असते, पण एखादेवेळी त्यांचेच बोलणे त्यांच्या गळ्यात येऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहात नाही.**

जन्म हा अखेरचा

## परकायस्थल - २



तुम्ही उताणे झोपलात तर फक्त त्याच बाजूला शय्येचे स्पर्शसुख मिळेल. उजव्या कडेला, पाठीला आणि पोटाला मिळणार नाही. अशाप्रकारे तुमचे शरीर जेंव्हा मृदू शय्येचे सुख अनुभवत असते तेंव्हा ते सुख शरीराच्या केवळ एका भागालाच मिळत असते, तीन भागांना मिळत नसते. त्याप्रमाणे संसारातील सुख मनुष्याला पूर्णांशाने कधीही मिळत नसते. त्यात काही ना काहीतरी उणीव असतेच आणि त्याचे शल्य प्रत्येकाच्या मनात राहते.

परमात्मा असा नाही. तो ज्याला प्राप्त होईल त्याला संपूर्णत: लाभेल. म्हणून संसारी मनुष्य कितीही ऐश्वर्यसंपन्न असला तरी तो दु:खी असतो आणि परब्रह्माची प्राप्ती झालेला मनुष्य कितीही दरिद्री असला तरी तो पूर्णसुखी असतो. कारण सुखरुप अशा परमात्म्याचा त्याला पूर्ण लाभ झालेला असतो. म्हणून सुखमय परमात्म्याचा लाभ झालेल्या सद्गुरुजवळ 'सर्व काही मीच आहे' अशी पराहंता उत्पन्न होते. जो सर्व विश्वाला आपल्या रुपात पाहतो, अशा सद्गुरुला सामान्य देहधारी समजणे हा भ्रम होय. **स्वस्वरुपं चिदाकारं ज्योतिः साक्षाद्विचिन्तयन् । देहवानपि निर्देहो जीवन्मुक्तो हि साधकः ।।१६.५४।।** आत्मा प्रकाशरुप आहे. दीपज्योत जशी आपल्या भोवतीचा अंधार दूर करते, त्याप्रमाणे हृदयकुहरातील अज्ञानांध:कार आत्मा दूर करतो. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## साहित्यातील मिरासदारी



मराठी साहित्यातील जेष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांचा काल म्हणजे २ ऑक्टोबर रोजी पहिला स्मृतीदिन होता. मागील वर्षी म्हणजे २ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारी पर्वाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल. द. मा. मिरासदार हे मराठीतील प्रख्यात विनोदी लेखक व कथाकथनकार होते.

१४ एप्रिल १९२७ रोजी त्यांचा जन्म झाला. द. मा मिरासदार यांचे पूर्ण नाव दत्ताराम मारुती मिरासदार असे होते. मात्र, ते द. मा या नावानेच प्रसिद्ध झाले. द. मा मिरासदार यांनी १९५२ साली अध्यापन क्षेत्रात प्रवेश केला. पुण्याच्या कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत ते शिक्षक होते. त्याआधी काही काळ त्यांनी पत्रकारिताही केली. १९६२ सालापासून त्यांनी कथाकथनास सुरवात केली. द. मा मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील यांनी ६०च्या दशकात संपूर्ण राज्यभर कथाकथनाचे प्रयोग केले. त्यांच्या कथाकथनाने महाराष्ट्राला अक्षरशः भुरळ घातली. द. मा मिरासदार हे विनोदी कथा सादर करायचे. त्या कथांचे लेखनही त्यांनीच केलेले असायचे. द. मा मिरासदार यांच्या भुताचा जन्म, माझ्या बापाची पेंड, व्यंकुची शिकवणी, शिवाजीचे हस्ताक्षर, माझी पहिली चोरी, हरवल्याच्या शोध या विनोदी कथा श्रोत्यांनी अक्षरशः डोक्यावर घेतल्या. द. मा. मिरासदार यांची कथा सादर करण्याची शैली खुमासदार होती. आपल्या खुमासदार शैलीत कथा सादर करत त्यांनी महाराष्ट्राला लोटपोट हसवले. द. मा. नी विपुल प्रमाणात लेखन केले. विनोदी कथा ही त्यांची खासियत होती. एकूण २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय त्यांनी १८ चित्रपटांच्या पटकथाही लिहिल्या आहेत. एक डाव भुताचा या चित्रपटाची कथा-पटकथा लेखन त्यांनी केले आहे. इतकेच नाही तर या चित्रपटात त्यांनी अभिनयही केला आहे. त्यांच्या विनोदी कथा ग्रामीण जीवनावर आधारित असत. ग्रामीण जीवनातील विसंगतीचे, विक्षिप्तपणाचे, इरसालपणाचे दर्शन त्यांच्या कथेतून घडत. त्यांनी केवळ विनोदीच नाही तर स्पर्श, विरंगुळा, कोणे एके काळी यासारख्या गंभीर कथाही लिहिल्या. द. मा. मिरासदार यांच्या अनेक कथांवर चित्रपट निघाले. त्यांच्या काही कथांचा समावेश शालेय अभ्यासक्रमातही करण्यात आला. त्यांना मानाचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधी न भरुन येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**- श्याम ठाणेदार, दौंड, जि. पुणे.**

# तरुणाईचा आवडता दांडीया रास

**दांडिया रास किंवा गरबा नृत्य हा एक नृत्याचा प्रकार असून हे नृत्य अश्विन महिन्यात नवरात्रीच्या काळात खेळले जाते. यामध्ये फक्त मुले, फक्त मुली आणि मुला-मुलींची जोडी असे तीन प्रकार असतात. दांडिया रास किंवा गरबा नृत्य हे प्रामुख्याने गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, पंजाब व दिल्ली या राज्यात खेळले जाते. परंतु त्याची लोकप्रियता पाहून त्यातील रुची पाहून व या नृत्यापासून मिळणारा आनंद पाहून संपूर्ण भारत देशात आता ते खेळले जाऊ लागले आहे. भारतातील प्रत्येक राज्यात काही ना काहीतरी वेगळे नृत्य प्रकार आढळतात. नवरात्रीच्या काळात महाराष्ट्रात, कर्नाटकात व दक्षिण भारतात भोंडला व घागरी फुंकणे हे नृत्य प्रकार आढळतात.**

भारतातील पूर्व भागात म्हणजे आसाम, पश्चिम बंगाल या भागात महिला, मुली फेर धरून पारंपारिक गाणी म्हणतात. तर पंजाब, हरियाणा काश्मीरमध्ये गरबा नृत्य व दांडिया रास खेळला जातो. पण सध्या संपूर्ण भारतामध्ये दांडिया रास हा नृत्य प्रकार सर्वांना आवडू लागला आहे. नवरात्रीचे दिवस आल्यानंतर घटस्थापनेनंतर तिसऱ्या दिवशी हा दांडिया रास खेळला जातो. यामध्ये दोन लाकडी टिपऱ्या असतात. त्या आकर्षक पद्धतीने रंगवून, त्यावर रंगीबेरंगी चमकी लावून, त्या टिपऱ्या चमकदार व शोभिवंत बनविल्या जातात. या दांडिया रासमध्ये मुला-मुलींचा पेहरावही विशिष्ट प्रकारचा असतो. मुलगी चोली व घागरा घालतात. मुले शेरवानी कुर्ता व पायजमा घालतात. मुलाच्या कमरेला उपरणे बांधलेले असते तर डोक्याला एक विशिष्ट प्रकारे रुमाल बांधलेला असतो. तसेच दोघांच्याही पायामध्ये राजस्थानी पद्धतीचे बूट असतात. अशा पेहरावात दांडिया खेळण्यासाठी मुले-मुली किंवा जोडपी एकत्रितपणे एखाद्या मंदिराच्या प्रांगणात किंवा जिथे या नृत्याचे आयोजन केले आहे, त्या मैदानात अगदी सजून सवरून येत असतात. त्यावेळी सर्वांच्या चेहऱ्यावरील आनंद अगदी ओसंडून वाहत असतो.

दांडिया रास किंवा गरबा नृत्य हे फार पुरातन नृत्य प्रकार आहे असे म्हणावे लागेल. पूर्वीच्या काळी संगीताचा साज हा मोजका असल्यामुळे दांडिया अल्प प्रमाणात खेळला जात असे. परंतु आता विसाव्या शतकातील या आधुनिक युगात संगीताची विविध साधने व तसेच उच्च प्रतीची साऊंड माध्यमे असल्यामुळे दांडियाचा आकर्षितपणा वाढला आहे. त्यातच आता हिंदी, मराठी, गुजराती, राजस्थानी, भोजपुरी व पंजाबी या भाषेतील संगीतातील विविधतेने नटलेली अनेक गाणी दांडियाच्या तालावर तयार झालेली आहेत.



दांडियाच्या एका विशिष्ट प्रकारच्या ठेक्यातील शेकडो गाणी आज उपलब्ध आहेत. यामध्ये महेंद्र कपूर, लता मंगेशकर, सी. रामचंद्र, आशा भोसले, मुकेश, म.रफी, किशोर कुमार यांच्या आवाजातील जुनी १९६१ ते १९९० च्या दशकातील अनेक हिट व साध्या चालीतील एका विशिष्ट ठेक्यातील गाण्यांचा समावेश असतो. भोली सुरत दिल के खोटे नाम बडे है लक्षण खोटे, हम तो तेरे आशिक है सदियों पुराने, हे नाम रे सबसे बडा तेरा नाम ये शेरोवाली या अशा तुफान गाजलेल्या गाण्यांचा यामध्ये समावेश असतो. यावेळी तेथील वातावरणात अगदी जल्लोष चाललेला असतो. त्यामध्ये तेथील सभागृह किंवा एखादे मैदान हे रंगीत विद्युत रोषणाईने सजविलेले असते. त्यामध्ये रंगीबेरंगी लाईटचे फोकस मारलेले असतात. प्रत्येक शहरातील सामाजिक संस्था, सेवाभावी संस्था किंवा काही दानशूर भक्तमंडळी स्वखर्चाने या दांडिया खेळाचे आयोजन करतात. यामध्ये स्पर्धाही भरविली जाते. उत्कृष्ट दांडिया खेळणाऱ्या स्पर्धकास योग्य मानांकन व बक्षीस दिले जाते. अशा दांडिया खेळणाऱ्या स्पर्धकाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केला जातो. अशावेळी त्या स्पर्धकाचे समाजात कौतुक होत असते. यावेळी 'आई भवानीचा उदो उदो' होत असतो. सर्वांना नवरात्री उत्सवाच्या शुभेच्छा !

**- अनिल जाधव.**


सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# कमळे गुरुजी म्हणजे त्याग, देशभक्तीचे प्रतीक : शिंदे

## भंडारकवठे येथे स्मारक कामाचे भूमीपूजन; दीनानाथ पुस्तकाचे प्रकाशन

सुराज्य/दक्षिण सोलापूर

ज्येष्ठ गांधीवादी तथा शिक्षणमहर्षी कै. दीनानाथ कमळे गुरुजी हे राजकारण-समाजकारण-शैक्षणिक या तीनही गोष्टींत तरबेज होते. त्यांनी गोरगरीब व मागास लोकांना एकत्र करून जिल्ह्यातील काँग्रेस जिवंत ठेवण्याचे काम त्यांनी केले. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे त्याग - देशभक्तीचे प्रतीक होते, असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठेचे सुपुत्र तथा सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे संस्थापक आणि माजी मंत्री स्व. दीनानाथ कमळेगुरुजी यांच्या स्मारक कामाचा भूमीपूजन समारंभ भंडारकवठे येथील जीवन विकास प्रशालेच्या प्रांगणात रविवारी शिंदे यांच्या हस्ते पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार सुभाष देशमुख, आमदार प्रणिती शिंदे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते- पाटील, माजी खासदार धर्मण्णा सादूल, संदीपान थोरात, प्रकाश यलगुलवार, धनाजी साठे, रामहरी रूपनर, विश्वनाथ चाकोते, राजशेखर शिवदारे, बाळासाहेब शेळके, जाफरताज पाटील, भारत जाधव, सतीश पाटील- वडकबाळकर, चेतन नरोटे, दत्तात्रय सुरवसे, बाबा मिस्त्री, अशोक देवकते, कमलताई कमळे, तहसीलदार राजशेखर लिंबारे, संस्थेचे अध्यक्ष पी. एल. कोळी, सचिव एम. डी. कमळे, डॉ. चनगोंडा हविनाळे, सरपंच चिदानंद कोटगोंडे, बाजार समितीचे संचालक वसंत पाटील, नरेश बदनोरे आदी मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री, दीनानाथ कमळे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर प्रा. डॉ. इक्बाल तांबोळी लिखित आणि जागृती पब्लिकेशन प्रकाशित दीनानाथ या पुस्तकाचे प्रकाशन शिंदे व आ. देशमुख यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, गुरुजी हे काँग्रेसचे असले तरी ते सर्वपक्षीय विचारांचे होते. त्यांच्या विचाराने संपूर्ण जिल्ह्यात जागृत करण्याची ताकद होती. गुरुजींनी काँग्रेस पक्ष जिवंत ठेवण्याचे काम केले. तो मोठ्या मनाचा माणूस होता. गुरुजी नेहमी काँग्रेस पक्षाची बैठक किंवा कार्यकर्त्यांच्या बैठकीत डायरी घेऊन टिप्पणी करायचे. तिच शिकवण आत्ताच्या कार्यकर्त्यांनी जोपासली पाहिजे. गुरुजी नेहमी म्हणत की, सत्तेचा उपयोग कधीही तडीतापडीतील लोकांसाठी करा. मी जरी ब्याऐंशी वर्षांचा झालो तरी अजूनही शिकण्याची तृष्णा भागली नाही. गुरुजींनी स्वत:च्या स्वार्थासाठी कधीही लाचारी पत्करली नाही. सुशीलकुमार शिंदे यांनी दीनानाथ कमळे गुरुजी यांचे अनेक राजकीय किस्से सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी आ. देशमुख बोलताना म्हणाले की, सुशीलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली स्मारकाचे काम लवकरच होईल. या स्मारकातून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळेल. शिक्षणाचे बाजरीकरण होऊ नये यासाठी गुरुजींचे विचार तळागाळापर्यंत पोहचवा. पुणे -लातूरप्रमाणे सोलापूर जिल्हासुध्दा शैक्षणिक हब करायचे असल्यास कमळे गुरुजींच्या संस्थेने नेतृत्त्व करण्याची गरज आहे. प्रास्ताविक करताना बाळासाहेब शेळके म्हणाले की, कमळे गुरुजींचे विचार जिवंत ठेवण्याचे काम स्मारकाच्या माध्यमातून व्हावी हीच यामागील उद्देश आहे. कार्यकर्त्यांची उंची वाढवायची असेल तर कमळे- शिवदारे-देवकते यांच्यासारखे योगदान दिले पाहिजे. आज गुरूजी जिवंत असले तर आत्ताचे राजकारण बघून त्यांच्या डोळ्यात पाणी आले असते. या वेळी अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्य पदी निवड झाल्याबद्दल एम. डी. कमळे, प्रा. डॉं. जैनोद्दिन मुल्ला, प्रा. डॉं. बी. एम. भांजे, प्रा. डॉं. भगवान अधटराव यांचा सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. ज्योती वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले तर अब्दुलरजाक बागवान यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील मान्यवर गुरुजींचे हितचिंतक संस्थेचे सर्व कर्मचारी वृंद, विद्यार्थी -नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हास्याचे फवारे...

सुभाष देशमुख बोलताना म्हणाले की, बाळासाहेब शेळके हे दबक्या आवाजात बोलतात त्यावर सुशीलकुमार शिंदे यांनी बोलताना आमच्या व तुमच्या पक्षातील सर्वजण दबक्या आवाजातच बोलतात असे बोलताच सर्व उपस्थितांमध्ये हशा पिकला. त्यानंतर या मतदारसंघातील मतदारांनी मला जनरल जागेवर सहा वेळा निवडून दिले त्याबद्दल मी मतदारसंघातील मतदारांचा आभारी आहे. परंतु आरक्षित जागेवर मला दोनवेळा पाडले हेच आजपर्यंत समजले नाही, असे सुशीलकुमार शिंदे हे म्हणतात पुन्हा हशा पिकला.




## बांधकाम विभागातील वाघचवरे, मुलगीर, मल्हारी, पाटील यांचा गौरव

सुराज्य/सोलापूर : अभियंता दिनाचे औचित्य साधून सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या वतीने उत्कृष्ठ अभियंता पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला उप अभियंता अशोक नागोजीराव मुलगीर, कनिष्ठ अभियंती गोविंद मल्हारी, कर्णवर पाटील, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सुजय सुभाष वाघचवरे यांचा ट्रॉपी, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. अधीक्षक अभियंता संजय माळी यांच्या हस्ते गुणवत्तेच्या आधारावर सर्वोत्कृष्ठ ठरलेल्या गौरव करण्यात आला तसेच शासन स्तरावरील पुरस्कार मिळालेल्या अधीक्षक अभियंता एस. जी. मुनगिलवार, . एस. आर. राऊळ, एन. डी. नाझरे या शाखा अभियंता आणि लिपीक वर्गीय कर्मचा-यांचे नेते अशोक इंदापूरे यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे उदघाटन अधीक्षक अभियंता माळी, मुनगिलवार कार्यकारी अभियंता चौगुले, गावडे तेलंग यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाची प्रस्तावना आर. एम. जेऊरकर, उप अभियंता यांनी केली या कार्यक्रमामध्ये मंडळांतर्गत काम करुन निवृत्त झालेल्या कार्यकारी अभियंता, उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांचा शाल व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला या कर्मचाऱ्यांनी ऊन फनी गेम खेळण्याचा आनंद लुटला. तसेच विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमामध्ये अधीकारी व कर्मचारी त्यांचे पाल्य यांनी सहभाग घेऊन बहारदार नृत्य व गाण्यांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजेंद्र जमादार यांनी केले



## ऑर्किडच्या चौदा विद्यार्थ्यांना १०.४८ लाखांचे पॅकेज

सुराज्य/सोलापूर : प्रज्ञा निकेतन एज्युकेशन ट्रस्ट पुणे संचलित ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाने आपल्या उत्कृष्ट प्लेसमेंटचे शिखर गाठत टी. आय. ए. ए. या मल्टिनॅशनल कंपनीमध्ये चालू वर्षी १४ विद्यार्थ्यांना १०. ४८ लाखांच्या उत्कृष्ट पॅकेजची संधी दिली आहे. या उत्कृष्ट यशाचे रहस्य म्हणजे ऑर्किड महाविद्यालयाने द्वितीय वर्षापासूनच सॉफ्ट स्किल व अटीट्यूड या विषयांचा आपल्या वेळापत्रकात अंतर्भाव केला आहे. महाविद्यालयातर्फे दिले जाणारे प्री प्लेसमेंट वर्कशॉप, कंपनी स्पेसिफिक ट्रेनिंग व कोडींग ट्रेनिंगमुळे हे घवघवीत यश संपादन करू शकलो, अशी प्रतिक्रिया निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी टी. आय. ए. ए. कंपनीमार्फत ऑनलाइन टेस्टचे आयोजन करण्यात आले त्यातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे टेक्निकल तसेच एचआर इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले व त्यातून ऑर्किडच्या १४ विद्यार्थ्यांची १०. ४८ लाखांच्या पॅकेजसाठी निवड झाली. ऑर्किड महाविद्यालयातील २०२१-२२ या वर्षात ४%० हून अधिक विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली आहे. निवड झालेले विद्यार्थी- अश्रीता मुतकिरी, ऐश्वर्या येमुल, भार्गव अंधे, अदनान मैनुलहक, ओम अंबरकर, सालिक पटेल, रामानंद मोहरे, लक्ष्मीप्रभा अणलदास, आदिती जाधव, यशस्वीनी अवटे, स्नेहल शिलवंत, शिवाजी बुधाराम, आशिष बिराजदार, ओंकार चारकुपल्ली.

## वास्तूविशारद विवेकानंद कोटा यांचे निधन

सुराज्य/सोलापूर : पद्मशाली समाजाचे भारतातील पाहिले वास्तूविशारद विवेकानंद तुकाराम कोटा (वय ८८) यांचे रविवारी दि. ०२ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, भाऊ, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शहरातील अनेक शैक्षणिक संस्था, महापालिकेच्या इमारती आणि हॉटेल्सची बांधणी त्यांच्या कल्पनेतून साकार झाल्या आहेत. बेसकर आर्च, इंद्रधनू वृध्दाश्रम या इमारतीच्या निर्माणासाठी विवेकानंद कोटा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी निर्माण केलेल्या पाचशेपेक्षा जास्त वास्तूना राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळाले आहेत.



जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा पंधरवड्याची सांगता

## प्राप्त प्रकरणांचा तत्काळ निपटारा करावा : जिल्हाधिकारी

सुराज्य/सोलापूर

सेवा पंधरवड्यामध्ये सर्व विभागांनी चांगले काम केले आहे. त्यामध्ये काही विभागांनी एकही प्रलंबित प्रकरण ठेवलेले नाही. उर्वरित विभागानी प्राप्त प्रकरणाचा तात्काळ निपटारा करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालय येथील बहुउद्देशीय सभागृहात सेवा पंधरवडा सांगता समारोप, महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या जयंती कार्यक्रमप्रसंगी शंभरकर बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, अन्न धान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे, सामान्य शाखेच्या तहसीलदार अंजली कुलकर्णी, संजय गांधी योजनेच्या तहसीलदार अंजली मरोड यांच्यासह आरोग्य, पोलीस, महसूल विभाग, महावितरण विभाग तसेच संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शंभरकर यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या कार्यालयातील प्राप्त प्रकरणे ज्या दिवशी प्राप्त होतील त्या दिवसापासूनच त्यावर कार्यवाही सुरू करावी, असे केल्यास कोणतेही प्रकरण प्रलंबित राहणार नाही. प्रशासन आपले आहे, असे नागरिकांना वाटावे, असे काम करा. लोकाभिमुख प्रशासन करण्यासाठी प्रयत्न करा. शमा पवार यांनी सेवा पंधरवड्यात प्रलंबित प्रकरणांविषयी केलेल्या कार्यवाहीची माहिती उपस्थितांना दिली. तसेच शासनाच्या किती सेवा नागरिक विनासायास ऑनलाईन यंत्रणेव्दारे घेऊ शकतात याबद्दलची माहिती दिली. या कार्यक्रमामध्ये लाभार्थ्यांना ७/१२ उतारे, संजय गांधी योजना, शिधापत्रिका, अपंगत्व प्रमाणपत्र, भूमिहीन दाखला, कंत्राटी कामगार लायसन्स तसेच मोहोळ, दुधनी, अक्कलकोट, मंगळवेढा नगरपरिषदमार्फत मिळणारे बांधकाम परवाने, पंतप्रधान आवास योजनेचे धनादेश, ई सेवा केंद्रामार्फत मिळणारे विविध दाखले, इत्यादींचे वाटप जिल्हाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन अव्वल कारकून अमर भिंगे यांनी केले तर आभार तहसिलदार अंजली कुलकर्णी यांनी मानले.

## राज्यातील ग्रंथालय कर्मचारी यांचे अर्थचक्र अर्थखात्यावर अवलंबून

सुराज्य/सोलापूर : राज्यातील १२१४५ ग्रंथालयात २१,६१५ ग्रंथालय कर्मचारी काम करतात सन २०२२-२०२३ या वर्षातील सप्टेंबर महिन्यात मिळणारे पहिल्या हप्त्याचे उर्वरित ३० कोटी अनुदान तसेच ६०% वाढीव अनुदानाची फाईल राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे एक महिने पासून मंजुरीसाठी प्रलंबित असल्याची टिका महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघ पुणे विभागाचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी केली आहे.

सन २०१४-२०१९ या पाच वर्षांत तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ६०% अनुदान वाढीची घोषणा २५ जून २०१९ रोजी विधीमंडळात केली होती. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनावर घेतले असते तर तेव्हाच शासन निर्णय झाला असता असेही सदाशिव बेडगे यांनी म्हटले आहे. राज्यातील २१,६१५ ग्रंथालय कर्मचारी पैकी ८०% ग्रंथालय कर्मचारी यांना शासनाने अनुदान वितरीत केल्यावर त्यांना वेतन मिळते सध्या विजयादशमी व दिवाळी सण जवळ आला असल्यामुळे अर्थमंत्री ग्रंथालय अनुदान फाईल मंजूर करण्यासाठी लक्ष देतील का?

ग्रंथालय कर्मचारी यांना तुटपुंजे वेतन मिळत असल्याने शासनाने वेळेत अनुदान वितरित केले तर त्यांच्या प्रापंचिक जीवनातील अडचणी काहींसा प्रमाणात सुटतात. अनुदानाची फाईल विनाविलंब मंजूर करून ग्रंथालय अनुदान दिवाळी अगोदर वितरीत करण्यात यावे असे बेडगे म्हणाले

## कामती बु येथे लम्पी रोग प्रतिबंधक लस

विरवडे बु /प्रतिनिधी : लम्पी या आजारापासून सरक्षण होण्यासाठी पशुधन वाचण्यासाठी मोहोळ शिवसेनेच्या वतीने कामती बु येते १०४५ जनावरांना लसीकरण करण्यात आले.

पशुधन विकास अधिकारी ड्रॉ प्रदीप रनवरे यांच्या मार्गदर्शनाखली ड्रॉ एम डी अंकुश, अशोक रणदिवे, समर्थ गुंड, आदित्य मोटे, ताानाजी रणदिवे, विशाल भुसे, बसाटे आदिनी कामती गावातील व परिसरातील १०५४ जनावरांचे लसीकरण केले, ड्रॉ रणदिवे यांनी लम्पी रोगा बद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली शेतकऱ्यांनी जनावरांची कोणती काळजी घ्यावी लागते याविषयी माहिती देण्यात आली, यावेळी बाळासाहेब खराडे, समाधान भोसले, आल्ताप शेख, विनोद भोसले, बापूराव पवार, आदी पदाधिकारी व शेतकरी उपस्तित होते, या शिबिराचे आयोजन शिवसेना तालुका प्रमुख अशोक बापू भोसले यांनी केले होते,

## शिक्षकांनी अध्ययनस्तर उंचवावा : देशमुख

सुराज्य/माळीनगर : शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा अध्ययनस्तर उंचावण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे असल्याचे माळशिरस तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी धनंजय देशमुख साहेब यांनी अकलूज केंद्राच्या सदाशिवराव माने विद्यालय अकलूज येथे आयोजित खाजगी प्राथमिक शाळांच्या शिक्षण परिषद कार्यशाळेत बोलताना व्यक्त केले.

या कार्यक्रमास अकलूज बीटचे विस्तार अधिकारी हर्षवर्धन नाचणे बी. आर. सी. माळशिरसचे विषयतज्ञ सतिश शिंदे, गणित विषयतज्ञ मुली नं२ शाळेतील पदवीधर शिक्षक प्रदीप कनाळ आदी व्यासपीठावर उपस्थित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकलूज केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र जाधव हे होते.

कार्यक्रमाचे आयोजन सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक विभाग अकलूज शाळेच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका नूरजहाँ शेख यांनी केले. कार्यक्रमाची सुरवात संगीत वाद्यवृंदाच्या तालावर परिपाठाने झाली. त्यानंतर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील आणि आक्कासाहेब यांच्या प्रतिमापूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यानंतर विषयतज्ञांनी निपुण भारत उद्दिष्टे संकल्पना -मराठी विषय, निपुण भारत गणित विषय यावर मार्गदर्शन केले. विस्तार अधिकारी हर्षवर्धन नाचणे यांनी ऑनलाईन कामाचा आढावा घेऊन सूचना दिल्या. त्यानंतर केंद्रप्रमुख राजेंद्र जाधव यांनी सर्व शाळांसाठी आवश्यक प्रशासकीय सूचना दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार गणेश करडे आणि गिरिश सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सारे जहाँ से अच्छा या समुहगीताने झाली. संगीत विभाग प्रमुख अजिंक्य नवगिरे आणि समावि माध्यमिक शाळेतील गायन करणार्या विद्यार्थीनीचे सर्वांनी कौतुक केले.

यावेळी शिक्षण परिषदेस अकलूज केंद्रातील अकलूज- माळीनगर परिसरातील सर्व खाजगी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका मोठ्यासंख्येने उपस्थित होते.



## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या नावाने खोटी जाहिरात

सुराज्य/सोलापूर

अण्णासाहेब पाटील विकास फाऊंडेशन सोलापूर च्या वतीने फेसबुक वर कुबेर फायनान्स या पेजद्वारा अण्णासाहेब पाटील महामंडळ ची जाहिरात टाकून मराठा समाजातील लोकांची फसवणूक करत आहे त्या विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार सायबर क्राईम चे पोलीस उपनिरीक्षक अविनाश नळेगांवकर यांना देण्यात आले

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या नावाने सोशल मीडियावर बिनव्याजी १० लाख कर्ज देतो म्हणून संपर्क करा अशी खोटी जाहिरात करून मराठा समाजातील युवकांची आर्थिक फसवणूक चालू आहे. कमिशन १६००० पहिला पाठवा लागेल आणि कमिशन आल्यानंतर ३ तासात तुमच्या खात्यावर पैसे जमा होतील असा मेसेज पाठवत आहे. तपासून त्याच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी सायबर क्राईम चे पोलीस उपनिरीक्षक अविनाश नळेगांवकर यांच्याकडे अण्णासाहेब पाटील विकास फाऊंडेशन जिल्हा अध्यक्ष रामभैय्या जाधव, राष्ट्रवादी विध्यार्थी काँग्रेसचे शहर अध्यक्ष निशांत सावळे, मराठा क्रांती मोर्चाचे विकी बाबा सूर्यवंशी, ललित धावणे उपस्थित होते.

मराठा समाजातील युवकांनी अश्या आमिषाला बळी पडू नये. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ मधून कर्ज पाहिजे असेल तर प्रत्येक जिल्ह्यात महामंडळ च ऑफिस आणि महामंडळांनी समनव्यक नेमल आहे. तेथे आपण संपर्क साधावा. कोणी पैसाची मागणी करत असेल तर संबंधीत व्यक्ती विरोधात तक्रार दाखल करावी

– **राम जाधव** (जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब पाटील विकास फाऊंडेशन )

कार्यकर्त्यांने चिठ्ठी दिली...

## अजितदादांनी डोक्याला हात लावला अन् पुढे असे घडले...

सुराज्य/उस्मानाबाद

किस्सा चिठ्ठी का

राष्ट्रवादीचे नेते आणि महाराष्ट्र विधान सभेचे विरोधी पक्षनेते अजितदादा पवार म्हणजेच आगच. त्यांच्या अतिस्पष्ट स्वभाव सर्वांना माहिती. त्यामुळे सगळेजण अजितदादा दबकून असतात हे वास्तव. त्यांच्यापुढे जावून बोलणे हे सुध्दा धाडसाचे असते. उस्मानाबादच्या एका कार्यक्रमात अजित पवार यांचे भाषण सुरु असताना, एका कार्यकर्त्यांने मोठ्या धाडसाने पवार यांना चिठ्ठी दिली. चिठ्ठी पाहून पवारांनी डोक्यावर हात मारत या कार्यकर्त्याला झापले त्याशिवाय त्याला काही गोष्टी समजूनदेखील सांगितल्या. या वेळी पवार यांनी मिश्किल टिपण्णी केली.

त्याचा किस्सा असा झाला की, एका कार्यकर्ता चिठ्ठी घेवून अजितदादांकडे गेला. भाषण करत असलेल्या पवारांच्या हातात त्यांनी चिठ्ठी देत ती वाचण्याबद्दल विनंती केली. या चिठ्ठीत म्हटलं होतं की, बारामती, माढात ज्या प्रमाणे विकास झाला तसा उस्मानाबादचा विकास करा. हे वाचल्यानंतर अजित पवारांनी भरसभेत या कार्यकर्त्याला आमदार पाडा आणि विकास करा, असा खोचक टोला लगावला. उस्मानबादमध्ये एस. पी. साखर कारखान्याच्या गळीत हंगाम उद्घाटनाच्या कार्यक्रमात हा किस्सा घडला. कार्यकर्त्याने दिलेल्या चिठ्ठीत लिहिलं होतं की, शेतकरी जीवंत राहिला, तर पक्ष १०० टक्के जीवंत राहतो. शेतकरी सक्षम करण्यासाठी पाणी महत्त्वाचे आहे. १५० आमदारच का, २८८ का नाही? तसेच सोयाबीनच्या भावावरही विचारणा केली होती.

### दादांच्या चिठ्ठी आयी है, गाण्याला शिट्टयांची दाद

भाषण सुरु असताना, एक कार्यकर्ता अजितदादांना चिठ्ठी देण्याच्या प्रयत्नात होता, त्यांच्या हे लक्षात येताच, त्यांनी स्टेजजवळच्या एका कार्यकर्त्याला घे रे ती चिठ्ठी असे सांगत 'चिठ्ठी आयी है' या गाण्याचे ताला सुरात शब्द उच्चारले. अजितदादांच्या या गाण्याच्या ओळीला उपस्थित कार्यकर्त्यांनी टाळ्या व शिट्ट्यांनी दाद दिली.

### अजितदादा खवळले म्हणाले, अरे मग तेच सांगतोय ना शहाण्या

कार्यकर्त्याच्या चिठ्ठीची दाखल घेत अजित पवार बोलत होते. मात्र त्या कार्यकर्त्याला समजत नव्हते, तेव्हा मात्र ते थोडे भ पवार म्हणाले, अरे मग तेच सांगतोय ना शहाण्या. बरं झालं याने सांगितलं. शरद पवार १० वर्षे कृषीमंत्री असताना राष्ट्रीय फलोत्पादन योजना त्यांनी आणली. देशातील शेतकऱ्यांचं ७२ हजार कोटी रुपयांचं कर्ज माफ केलं. कांद्याचे दर पडले तेव्हा शरद पवारांनी निर्यातबंदी उठवली आणि कांदा निर्यात करून चांगला भाव मिळवून दिला. सगळ्यांना आधारभूत किंमत मिळवून दिली.



## वन्यजीव संरक्षण गरजेचे : पाटील

**सुराज्य/सोलापूर** : संगमेश्वर महाविद्यालयातील प्राणिशास्त्र व वनस्पती शास्त्र विभाग व वनविभाग सोलापूर आणि युगंधर फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहानिमित्त कार्यक्रम राबविण्यात आले.

याप्रसंगी सोलापूर वनविभागाचे उपवन संरक्षक धैर्यशील पाटील, सहायक वनसंरक्षक लक्ष्मण आवारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. पाटील व लक्ष्मण आवारे यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव संरक्षण करण्याची गरज व वन्यजीव संरक्षण कायदे याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच वन्यप्राण्यांबद्दल बोलताना 'जगा आणि जगू द्या' हा मूळ मंत्र दिले. वन्यजीव तस्करी व समाजातील प्राण्यांबद्दल असणारी अंधश्रद्धा व व त्यांचा गैरवापर याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्राध्यापिका डॉ. बगले एम. बी. यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य यांनी भूषविले.

कार्यक्रमास माननीय दीपक खलाने, संजय भोईटे, वनपरिक्षेत्र अधिकारी व वन संरक्षक श्रीशैल पाटील, वनपाल शंकर कुताटे, रोहन इंगवले, रुकेश कांबळे, शशिकांत सावंत. वन रक्षक यशोदा आदलिंगे उपस्थित होते. तसेच संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राध्यापिका डॉ. किणगी एस. एस., प्राध्यापिका डॉ. श्रद्धा बेळगुंपे, प्राध्यापक डॉ. सौरभ जाधव, कोळी आर एस., विनायक सारंगमठ उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. पाटील एस. एस. यांनी केले तर आभार वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. दहिटणेकर यांनी मानले.

## काडादी प्रशालेत राष्ट्रपिता म. गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी

**सुराज्य/सोलापूर** : अण्णप्पा काडादी प्रशालेत राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल पाटील, उपमुख्याध्यापिका सुरेखा म्हमाणे, पर्यवेक्षक दत्तात्रय पाटील, प्राथमिक मुख्याध्यापक सचिन पाटील या मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्रीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल पाटील यांनी केले. गांधीजी आणि शास्त्रीजी यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे देशाच्या विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी वाहिले, त्यांनी जीवनात सत्य, अहिंसा, सत्याग्रह ही त्रिसूत्री अंमलात आणून एक आदर्श आपणापुढे ठेवला. उभयतांचे जीवन आपल्यासाठी सदैव प्रेरणादायी आहे, असे ते यावेळी म्हणाले. सूत्रसंचालन पल्लवी मिणकेरी आणि साक्षी डोळसे या विद्यार्थिनींने केले तर उपस्थितांचे आभार सृष्टी बडदाळे हिने मानले.

## रग्बी कार्यशाळेत ११० खेळाडूंचा सहभाग

**सुराज्य/सोलापूर** : कुमठा नाका क्रीडा संकुल येथे रग्बी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ११० खेळाडूंनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन सोलापूर जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे सचिव संजय शिंदे यांचे हस्ते करण्यात आले यावेळी रग्बी संघटनेचे सचिव इक्बाल शेख उपस्थित होते. या कार्यशाळेत रग्बी खेळाची सविस्तर माहिती रग्बी संघटनेचे सहसचिव संजय शिंदे यांनी दिली व खेळाची नियमावली व मैदानात प्रत्यक्ष मार्गदर्शन अरणचा वरिष्ठ खेळाडू विक्रम वाघमारे यांनी केले. जास्तीत जास्त शाळांनी रग्बी खेळात सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी सुरेश सोनवणे मनोज बाळगे, चेतना म्हेत्रे, प्रचिता जोगदांडे, कावेरी कोडते, धनंजय धेंडे उपस्थित होते.

## सत्याचरण व सदाचरण हीच गांधीजी व शास्त्रींना श्रद्धांजली : डॉ. येळेगावकर

**सुराज्य/सोलापूर** : भ्रष्टाचाराच्या, अनाचाराच्या, हिंसाचाराच्या, दहशतवादाच्या, सत्तेसाठी व तत्त्वनिष्ठेलाही तिलांजली देणाऱ्या जगामध्ये म. गांधीजी व लालबहादूर शास्त्रीजी यांची सत्याचरण, सदाचरण व अहिंसेची शिकवण जगाला तारू शकेल, असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. ते ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, आय. क्यू. ए. सी. विभाग व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंती सेवा सप्ताहाच्या उद्धाटन कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुर्ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे हे होते.

यावेळी फॅमिली प्लॅनिंगचे अध्यक्ष प्राचार्य के. एम. जमादार, खजिनदार डॉ. एन. बी. तेली, डॉ. रजनी दळवी, डॉ. नी जॉन, डॉ. राजेंद्र वडजे, ऐश्वर्या सावंत, अपेक्षा सावंत सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. रजनी दळवी यांनी केले. प्रास्ताविक फॅमिली प्लॅनिंगचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार डॉ. राजेंद्र वडजे यांनी मानले.

## आस्था रोटी बँकेतर्फे गोरगरिबांना मोफत डोळे तपासणी

**सुराज्य/सोलापूर** : आस्था रोटी बँक, लायन्स क्लब ऑफ सोलापूर, व सूर्यमुखी मारुती चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर सग्गम नगर जुना बिडी घरकुल जवळ येथे आयोजित करण्यात आले आहे. आस्था रोटी बँक नेहमी सामाजिक कार्याचा हेतू समोर ठेवून कार्य करताना दिसून येत आहे. त्यामध्ये अन्नदान वस्त्रदान निराधारांना आधार बेगर आहेत. त्यांना घरासाठी मदत व ज्यांचे नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झाले त्यांना मदत, हिंदू धर्मातील महत्त्वाचे सण समारंभाच्या वेळी रस्त्यावरील भटके, अनाथ लहान पोरं वयस्कर अशा व्यक्तींना त्यांच्या गरजा पाहून मदत करणे आजारी व्यक्तींना मोफत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यापासून ते एखाद्या व्यक्ती रस्त्यावर जर मरण तर त्यांच्या अंतिम संस्कार तयारी करण्यापर्यंत आस्था रोटी बँकेचे कार्य करण्यात अग्रेसर असलेली दिसून येते. आस्था रोटी बँकेचा हेतू शुद्ध असल्यामुळे अनेक दानशूर व्यक्तींने पुढे येऊन मदत करताना दिसतात. व आस्था रोटी बँकेचे अध्यक्ष विजय छंचुरे व त्यांचे सहकारी यांचे कौतुक होताना दिसत आहे. हे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे असे म्हणावे लागेल. याप्रसंगी प्रमुख पाहुणे रुपेश जाधव, डॉ. शिवाजी पाटील, मल्लिकार्जुन आरकल, राजू हौशेट्टी, नीलिमा हिरेमठ, कांचन हिरेमठ, योगेश कुंदुर, निनाद आकतनाळ, अनिल जाधव, छाया गंगणे, विजय छंचुरे उपस्थित होते.

# स्वामी समर्थ कारखाना यंदा गाळप करणारच : पाटील

**सुराज्य/अक्कलकोट**

**स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या दुरुस्तीचे काम नाशिक येथील खासगी कंपनीला दिले असून स्वतःची इस्टेट गहाण टाकून पै पाहुण्यांकडून उसने पैसे घेऊन कारखाना सुरू करण्यासाठी प्रयत्न करत आहे. रविवारी वीज पुरवठा पूर्ववत सुरू झाला असून यंदा गाळप सुरू करणारच असल्याची माहिती चेअरमन माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.**



स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना गेल्या ८ वर्षापासून तत्कालीन कार्यकारी संचालक यांच्या व काही तांत्रिक अडचणीमुळे बंद पडली होती. कारखाना चालू करण्यासाठी चेअरमन सिद्रामप्पा पाटीलसह सर्व संचालक मंडळांनी सर्व संकटांना सामोरे जात शेतकऱ्यांचा हक्काचा कारखाना लवकरात लवकर चालू करण्यासाठी स्वत:ची संपत्ती गहाण ठेवून कारखाना चालू करण्याचे चंग बांधलेला आहे. गेल्या काही दिवसांपासून खंडीत झालेला वीज पुरवठा पूर्ववत सुरू झाला असून, पाण्याची पाईपलाईन चालू करणे, परिसरातील झाडी, झुडपे, गवताची नायनाट करणे, कर्मचाऱ्यांच्या निवासाची डागडुजी करणे आदी कामे जोमाने चालू असून यंदाचे गळीत हंगाम चालू करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे ऊस गाळप करण्याच्या हेतूने नाशिक येथील परिश्रम इंजिनिअरिंग वर्क्सचे मोरे, माने यांना मिल विभाग टरबाईन, वेब्रिज, बॉलिंग हॉऊस, सेंट्री फ्युगल, शुगर ग्रिडर आदी मशीनरिचे दुरुस्तीचे काम कराराचे टेंडर देण्यात आला असून या कामी २५० ते ३०० अनुभवी कर्मचारी, खोल फिटिंग व दुरुस्तीचे काम महिन्यात पूर्ण करून गाळपास कारखाना तयार करणार असल्याचे नाशिक परिश्रम इंजिनिअरींग वर्क्स बरोबर कारखान्याचे चेअरमन सिद्रामप्पा पाटील यांनी करार केल्याने कारखान्याचे संपूर्ण काम दोन महिन्यात पूर्ण होऊन दोन महिन्यात गाळपास सज्ज होणार असल्याने तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.याप्रसंगी पत्रकारांशी संवाद साधताना माजी आमदार पाटील बोलत होते. कारखान्यात पेटलेली वीज नुसतीच कारखान्यातली वीज नसून ही शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश आणणारी आहे असेही सांगितले.

यावेळी पंचायत समितीचे मा. सभापती संजीवकुमार पाटील, दिलीप पाटील, तज्ञ संचालक तथा कृषीरत्न अप्पासाहेब पाटील, विश्वनाथ भरमशेट्टी, साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय सचिव अशोकराव मुलगे, चीफ इंजिनिअर तथा मुख्य अभियंता हणमंतराव रेड्डी, दुधनी चे महेश पाटील, सुधीर मचाले, सलगरचे मल्लीनाथ भासगी, वासीम मुल्ला कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी, संचालक व पदाधिकारी पस्थित होते.

> ✻ माजी आमदार सिद्रामप्पा पाटील- कारखाना डागडुजी साठी अंदाजे १५ कोटी व ऊस कामगार टोळी साठी १० कोटी अंदाजे खर्च सध्या तरी अपेक्षित असून हे खर्च पै पाहुण्यांकडून उसने घेऊन स्वतः मालमत्ता गव्हाण ठेवून काम सुरू आहे.
>
> ✻ कारखाना सुरू करण्यासाठी मदत करण्याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून त्यांनी मदत करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनीही असे बंद कारखाने सुरू करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत भेट घेऊन विनंती केली आहे.

## कवितांच्या वाचन-गायनाचा 'वसंतोत्सव'

**सुराज्य/सोलापूर**



'भव्य हिमालय तुमचा अमुचा केवळ माझा सह्यकडा', 'अस्सल लाकूड भक्कम गाठ ताठर कणा टणक पाठ', 'फुंकर', ही मैफल अपुली अखंड चालो अशी' अशा एकापेक्षा एक आशयगर्भ कवितांची सुरेल मैफल अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पद्माकर देव सभागृहात उत्तरोत्तर रंगत गेली.

निमित्त होते अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेच्या वतीने रंगवर्धन उपक्रमांतर्गत वसंत बापट यांच्या कवितांच्या वाचन व गायनाच्या 'वसंतोत्सव' या कार्यक्रमाचे. गायक प्रशांत देशपांडे, डॉ. श्रीकांत कामतकर, रजनीश जोशी आणि गुरूराज जोशी यांनी हे सादरीकरण कवी वसंत बापट यांच्या जन्मशताब्दीनिमित्त केले. नाट्यपरिषदेचे अध्यक्ष, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, प्रा. जोतिबा काटे, नाट्यकलावंत सुनील गुरव, डॉ. विश्वास जेऊरकर, आनंद खरबस यावेळी उपस्थित होते. नाट्य परिषदेचे ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी प्रास्तविक केले. कार्यक्रमाची संहिता रजनीश जोशी यांनी तयार केली होती. 'गगन सदन तेजोमय' ही प्रार्थना प्रशांत यांनी त्यांच्या भावपूर्ण आवाजात गायली. पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात गेलेल्या पण मूल्ये बदललेल्या पिढीवर केलेली जळजळीत उपहासात्मक दीर्घकविता 'सावंत' डॉ. कामतकर यांनी म्हटली. 'बाभूळझाड' या कवितेत बापटांनी भाऊसाहेब रानडे या खंबीर व्यक्तिंचे रूपकात्मक चित्रण केले आहे, ती कविता गुरूराज जोशी यांनी सादर केली. सुहास मार्डीकर यांनी आभार मानले.

## पतीने-पत्नीच्या डोक्यात घातला लोखंडी रॉड

**सुराज्य/सोलापूर** : पोलिसात दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरून पतीने पत्नीच्या डोक्यात लोखंडी रॉड घालून जखमी केल्याची घटना दि.१ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बंद लक्ष्मी नगर तळे हिप्परगा येथे घडली. याप्रकरणी अलका संतोष मोरे (रा. प्रभाकर महाराज मंदिर जवळ, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती संतोष नारायण मोरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी अलका मोरे या त्यांचे दीर श्रीकांत नारायण मोरे यांच्यासोबत बंदी लक्ष्मी नगर येथे मुलीला भेटण्यासाठी गेले होते. त्यावेळी संतोष मोरे यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारींचा व त्यांच्यावर झालेल्या कारवाईचा राग मनात धरून फिर्यादी अलका मोरे यांची भावजय, सासू, जाऊ व फिर्यादी यांचा भाऊ यांना केली. त्यानंतर फिर्यादी यांचा भाऊ भांडण सोडवण्यासाठी मध्ये आला असता त्याचा गळा दाबून खल्लास करतो, असे म्हणत फिर्यादीच्या डोक्यात लोखंडी रॉड मारून दुखापत केली आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक माने हे करीत आहेत.

## बसमध्ये बसताना मोबाईल पळवला

**सुराज्य/सोलापूर**

बसमध्ये बसताना अज्ञात चोरट्याने ३५ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना दि.१६ सप्टेंबर रोजी सायंकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास मार्केट यार्ड येथे घडली. याप्रकरणी खंडप्पा काशिनाथ धुम्मा (वय-४८, रा. ता. मुरूम, जि. उस्मानाबाद) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास मपोना सय्यद या करीत आहेत.

### वीज चोरी प्रकरणी एकावर गुन्हा दाखल

स्वतःच्या फायद्यासाठी वीज चोरी करून महावितरण कंपनीला फसवून दंडाची रक्कम न भरल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी गणेश नागनाथ कोळी (वय-३६, रा. सहायक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सोलापूर) यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून बरबलसिंग लाखनसिंग दुधनी (वय-३६, रा. शिकलकर वस्ती, हनुमान नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे त्यांचे सहकारी स्वप्निल शेप व शमिश कोळी यांच्यासोबत वसुली करीत होते. त्यावेळी कायमस्वरूपी वीज बिल न भरलेल्या वीजपुरवठा खंडित झालेले ग्राहक दुधनी यांनी घराशेजारील वितरणचे ग्राहक कलाकोर त्रिपालसिंग टाक यांच्या महावितरणच्या काळ्या रंगाच्या इन्कमिंग वायर मधून डायरेक्ट अनधिकृतपणे वीजपुरवठा घरात घेतला.तसेच या वीज चोरीच्या कालावधीमध्ये महावितरण कंपनीचे ११ हजार ६०० रुपयांचे नुकसान केले व नुकसान झालेली रक्कम अद्यापपर्यंत भरलेली नाही, असे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक भोगशट्टी हे करीत आहे.

### पार्किंगमध्ये लावलेली दुचाकी पळवली

अज्ञात चोरट्याने पार्किंगमध्ये लावलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डीडी.०२८५ ही चोरून नेल्याची घटना दि. ३० सप्टेंबर रोजी सकाळी दहा ते साडेबारा वाजण्याच्या दरम्यान शुभम हौसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी होटगी रोड येथील पार्किंग मध्ये घडली. याप्रकरणी नागनाथ पांडुरंग शिवशरण (वय-२४, रा. मु. पो. वडकबाळ, ता. दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक बर्डे हे करीत आहेत.

### सायकलस्वारास धडक

भरधाव वेगाने निघालेल्या दुचाकीने चालकाने सायकलस्वारास धडक देऊन जखमी केल्याप्रकरणी दुचाकी चालकाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. २३ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास जुळे सोलापूर येथील आय.एम.एस शाळेकडून महापालिका दोन क्रमांक ५ येथील गेट जवळ घडली. याप्रकरणी सिद्धाराम सावळा वाघमारे (वय-५२, रा. सिद्धेश्वर नगर, मयुरेश्वर विलाजवळ, विजापूर रोड) यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मोटार सायकल क्रमांक एम.एच.१३. सीएल.००८६ या क्रमांकाच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कांबळे हे करीत आहेत.

## गोप यांच्या वाढदिवसानिमित्त सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचा गौरव



**सुराज्य/सोलापूर**

एस. के. फाऊंडेशनच्यावतीने पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथजी गोप यांचे वाढदिवसानिमित्त संस्थेतील सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचा सन्मान करण्यात आला

एस. के. फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास कटकूर यांच्या ध्यक्षतेखाली , जेष्ठ लेखक साहित्यिक व्यंकटेश देवनपल्ली, सिध्देश्वर आर्किटेक्चर कॉलेजचे प्राचार्य यादगिरी कोंडा, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सहसचिव संगीताताई इंदापुरे, शालेय समिती अध्यक्ष श्रीधर चिट्याल, एस.के. फाऊंडेशनचे सचिव यशवंत इंदापुरे आणि मुख्याध्यापक युवराज मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला

प्रथम शाळेचे डिजिटल क्लासचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सर्व पाहुण्यांचे स्वागत मुख्याध्यापक युवराज मेटे यांनी केले तर प्रास्ताविक सचिव यशवंत इंदापुरे यांनी फाऊंडेशनचे कार्याची माहिती दिली.

यावेळी सर्व प्रमुख पाहुण्यांचे शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला तदनंतर सेवानिवृत्त मुख्याध्यापिका कमल वल्लाकाटी, कमल भोळा, माजी मुख्याध्यापक मधुकर गवळी आणि अंबादास कंची यांचा शाल, मोती हार, फेटा आणि बुके देऊन सत्कार करण्यांत आले. वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना लाडू वाटप सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक मल्लिकार्जुन जोकारे, मेरगू शिक्षक आणि शिक्षकेत्तर सेवक अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नंदिनी कटकूर, प्रथमेश वाडे, गायकवाड, प्रवीण गोप आदिंनी पराश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार मलिक पठाण यांनी केले.

# 'तफिसा'तर्फे वर्ल्ड वॉकिंग डेनिमित्त प्रश्नांचा जागर

**सुराज्य/सोलापूर**

**ऑक्टोबर जागतिक वॉकिंग डे निमित्त द असोसिएशन ऑफ स्पोर्ट्स फॉर ऑल, सोलापूर (तफिसा) या संस्थेच्यावतीने गणपती घाट ते सिध्देश्वर मंदिर परिसरात वॉकिंग करत स्मार्ट सोलापूरसह विविध सामाजिक प्रश्नांचा जागर करण्यात आला.**

प्रारंभी तफिसाचे सर्व पदाधिकारी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास वंदन करून संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून बालचमूंच्या हस्ते गणपती घाटावर भगवान श्री गणेशाचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

सर्व बालचमू यांनी उपस्थित मान्यवरांकडून मशाल स्विकारत इंग्रजी, हिंदी, मराठी, उर्दू, कन्नड, तेलुगू, संस्कृत आणि मारवाडी या भाषेत कोरोना जनजागृतीपर शपथ घेतली.

जगभरातील ९५ देशात २ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान वर्ल्ड वॉकिंग डे उत्साहात साजरा केला जातो. तफिसा ही संस्था जागतिक आरोग्य संघटना, इंडियन ऑलिम्पिक कमिटी यांच्याशी संलग्न असून येणाऱ्या काळात सोलापूरच्या क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी संस्थेच्यावतीने करण्यात येणार असल्याची माहिती तफिसाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.



द असोसिएशन ऑफ स्पोर्ट्स फॉर ऑल, सोलापूर (तफिसा) यांच्यावतीने आयोजित वर्ल्ड वॉकिंग डे निमित्त सोलापुरातील नामांकित संस्था, संघटना आणि विविध क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला. कार्यक्रमात डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. स्मित जानराव, रिपाइं (आठवले गट) महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, जी एम. संस्थेचे बाळासाहेब वाघमारे, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. नसिमा पठाण, सार्वजनिक आरोग्य अभियंता सोमपा संजय धनशेट्टी, ॲड. प्रमोद शहा, अस्थीरोग तज्ज्ञ डॉ. सचिन नरोटे, प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, सुधाताई अळळीमोरे (पतंजली योग), डॉ. प्रवीण खारे (स्त्री रोग तज्ञ), प्रसाद जगताप, कृष्णा चिंचकर, समर्थ लिंबोळे, मदिना मुल्ला, अश्विनी देवकर, वसीम शेख, सुगत गायकवाड, वीरेंद्र परदेसी, ऐश्वर्या सावंत, द असोसिएशन ऑफ स्पोर्ट्स फॉर ऑल, सोलापूर संस्थेचे संस्थापक ट्रस्टी अप्पासाहेब चिंचकर, ऑल महाराष्ट्र असोसिएशन ऑफ स्पोर्ट्स फॉर ऑलचे रमेश ज्ञानतारा जाधव (मुंबई), सोलापूर जिल्हा अध्यक्ष. डॉ. प्रमोद कसबे, सचिवा संपदा जोशी, खजिनदार प्रकाश चिंचकर, उपाध्यक्ष विजय कुंदन जाधव, कवी देवेंद्र औटी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) मधील प्रा. भाग्यश्री देसाई-निकम, विजय गायकवाड, वसिम शेख, आरती काशीकर, अर्चना वाघमारे मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक व सूत्रसंचालक शाहीर रमेश खाडे, आभार संस्था अध्यक्ष डॉ. प्रमोद कसबे यांनी केले. शेवटी आनंदीबाई जोशी बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. सुपर स्पोर्ट्स क्लबचे वाशिम शेख, मदिया मुल्लू, मनिष लिंबोळे, कृष्णा चिंचणकर, अश्विनी देवकर यांनी परिश्रम घेतले.

# नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी नगरपंचायतीचे चांगले काम : देशमुख

सुराज्य/नातेपुते

नातेपूते नगरपंचायतकडून नागरींकांच्या अपेक्षा वाढल्या असून त्या सोडविण्या साठी सर्वजण काम करत आहेत, रस्ते, गटार, लाईट यासंदर्भात मोठे काम करावे लागणार आहे. असे स्पष्ट मत सोलापूर जिल्हा परीषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमूख यांनी व्यक्त केले.

महात्मा गांधी व लाल बहाद्दूर जयंती तसेच ७५ व्या स्वातंत्यनिमीत्त विविध स्पर्धेच्या बक्षिस वितरण प्रसंगी ते बोलत होते,

बाबाराजे देशमूख बोलताना म्हणाले कि, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार राम सातपुते, खासदार रणजितसिंह निबांळकर यांचेही नातेपुते शहराच्या विकासाकडे लक्ष असून कधींही मदत करायला तयार आहेत. सर्व नगरसेवक चांगले



काम करत आहेत. यावेळी प्रास्ताविक उपनगराध्यक्ष मालोजी देशमूख यांनी केले पंचांयत समिती सदस्य माऊली पाटील, नगराध्यक्षा उत्कषाराणी पलंगे यानी मनोगत व्यक्त केले तर प्रशांत सरूडकर यांनी महात्मा गांधी व लाल बहाद्दूर शास्त्री यांच्या विषयी विचार मांडले

यावेळी नगरपंचायतव्दारे विविध स्पर्धाचे बक्षिस वितरण करण्यात आहे त्यामध्ये चित्ररथासाठी नातेपुते एज्यूकेशन सोसायटी प्राथमिक विभाग, शंकरराव मोहींते पाटील महाविद्यालय, एस. एन, डी इग्लीश मिडियम स्कूल. तसेच संचालनासाठी चंद्रप्रभू इग्लीश मिडियम स्कूल, बा, ज. दाते प्रशाला, रत्नप्रभादेवी कन्या प्रशाला यांना अनूक्रमे प्रथम, व्दितीय, तृतीय क्रंमाक देण्यात आले, ट्राफी, व प्रमाणपण देण्यात आले, सर्व शाळांना नगरपंचायतीच्या विविध उपक्रमात सहभाग प्रमाणपत्र देण्यात आली

यावेळी गणेश मंडळाना विशेष देखाव्यासाठी बक्षिस देण्यात आली त्यामध्ये, श्रींक ष्ण मंडळ, शिवछत्रपती, , श्रीगणेश प्रति ष्टाष्ण यांना बक्षिसे देण्यात आली या कार्यक्रमास माजी जिप उपाध्यक्ष बाबाराजे देशमूख, रघूनाथ कवितके, माऊली पाटील, जननायक मामासाहेब पांढरे, उत्कर्षाराणी पलंगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमूख, बांधकाम सभापती अतुल पाटील, मूख्याधिकारी माधव खांडेकर, सपोनि प्रविण संपांगे, नगरसेवक अविनाश दोशी, रणजित पांढरे, आण्णा पांढरे, शर्मिला चांगण, अतूल बावकर नंदू लांडगे, माऊली उराडे, बाळासाहेब काळे, रणवीर देशमूख, प्रशांत सरूडकर, आप्पासाहेब भांड, अजेश पांढरे गणेश उराडे तसेच शिक्षक-शिक्षिका, सेवानिवृत्त शिक्षक. आशा वर्कर, विध्यार्थी मोठ्या संख्खेने उपस्थित होते.



## सामाजिक काम करून जनतेची सेवा करा : खा.डॉ. महास्वामी

सुराज्य/विरवडे बु : जिल्ह्यात, राज्यात आणि देशात जनतेने भारतीय जनता पार्टीला काम करण्याची मोठी संधी दिली आहे. या संधींचं सोनं करत सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांच्या हितासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस न भूतो न भविष्यती काम करत आहेत. यांच्याच कामाचा आदर्श घेत आपण जनतेपर्यंत पोहोचलं पाहिजे. त्यासाठी जिथे शक्य असेल तिथं सामाजिक कार्य करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा पंधरवडा'अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समितीचे तज्ञ संचालक अंकुश आवताडे यांच्यावतीने कामती पोलीस स्टेशन येथे वृक्षारोपण, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप व गावांमध्ये जंतूनाशक फवारणी शुभारंभ करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण, कामती पोलीस स्टेशनचे स. पो. नि. अंकुश माने, भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष शंकरराव वाघमारे, भाजपा मोहोळ शहर सरचिटणीस विशाल डोंगरे, जयसिंग आवताडे, प्रकाश आवताडे, युवराज आवताडे, दिनकर पवार, ज्ञानू पाटील, कामतीचे माजी उपसरपंच विठ्ठल माळी, भाजपा उद्योग आघाडी जिल्हाध्यक्ष मेजर लिंगदेव निकम, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, परमेश्वर पिंपरीचे सरपंच दीपक पुजारी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## वेळापूर येथे कृषी सल्ला केंद्राचे उद्घाटन

सुराज्य/वेळापूर : वेळापुर येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी आयोजन करण्यात आले आहे. कृषि सल्ला केंद्राचे उद्घाटन वेळापुर सरपंच सौ. विमलताई उत्तमराव जानकर यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उपसरपंच जावेद मुलाणी, संजयआबा मंडले, लखन मंडले, सुखदेव आडत, शिवाजी मोहिते, वसंत क्षिरसागर, उमेश भानवसे, विनायक चंदनशिव, ग्रामविकास अधिकारी डी. के. गोरे तसेच प्रमुख अतिथी म्हणून असिस्टंट बीडीओ मोरे उपस्थित होते. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी बांधव, वेळापुर ग्रामस्थ तसेच आमचे मार्गदर्शक चंदनकर उपस्थित होते. कार्यक्रमातील मान्यवरांचा सत्कार करून उपस्थितांना पर्यावरण वाचवा, सेंद्रिय शेतीकडे वळा असा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून कृषी मित्रांनी दिला. शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील, प्राचार्य आर. जी. नलवडे सर प्राध्यापक एस. एम. एकतपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नाई कृषि महाविद्यालय अकलुज येथील कृषिमित्र राहुल करांडे, हर्षद पावडे, सत्विजत वाघमोडे, लाला राउत, राहुल कोळेकर, प्रमोद फरतडे, गणेश शिंदे, या कृषी मित्रांनी ग्रामीण जागरुकता कार्यक्रमाअंतर्गत कृषि सल्ला केंद्राचे उद्घाटन या कार्यक्रमाचे आयोजन केले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांचे व शेतकरी बांधवांचे आभार मानण्यात आले.

## आरोग्य कर्मचारी युनियनच्या जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत पवार

सुराज्य/उत्तर सोलापूर : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाशी संलग्न असलेल्या जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी युनियनचे राज्य अध्यक्ष निर्मल पवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत प्राथमिक आरोग्य केंद्र मरवडे तालुका मंगळवेढा येथील आरोग्य सेवक चंद्रकांत पवार यांची जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी युनियनच्या जिल्हा अध्यक्षपदी, प्राथमिक आरोग्य केंद्र शिरापूर तालुका मोहोळ येथील आरोग्य सहाय्यक विष्णू सानेपागुल यांची जिल्हा सरचिटणीस पदावर निवड करण्यात आली. रमाकांत साळुंखे, राजेश देशपांडे, दिनेश बनसोडे, सुरेश राठोड, प्रकाश माने, गुरुनाथ जाधव, सुरेखा जवळकर यांची प्रमुख उपस्थितीत निवड करण्यात आली. पवार यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी संघटनेतील सदस्य उपस्थित होते.



## कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना पटवून दिले स्वच्छतेचे महत्व

सुराज्य/वेळापूर : पावसाळ्यात वातावरणात आद्रतेचे प्रमाण अधिक असते आणि त्यामुळे वेगवेगळ्या बुरशी जिवाणू व विषाणू यांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होतो व त्याचा विपरीत परिणाम गुरांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर होतो असे होऊ नये म्हणून गुरांच्या गोठ्याची स्वच्छता अत्यावश्यक असते. गोठ्याची स्वच्छता शास्त्रीय पध्दतीने व वेळोवेळी केली पाहिजे तसेच निर्जंतुकीकरण करणे हे आवश्यक आहे. असे मार्गदर्शन रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज च्या खंडाळी येथील कृषी कन्या सोनाली सुर्वे, प्रीती दुधाळ, विद्या राऊत, अनिषा भोसले, शिवानी घाडगे, सुजाता खांडेकर, प्रणाली ढुमणे, वैष्णवी कदम यांनी खंडाळी येथील शेतकरी उध्दव पताळे यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. या प्रात्यक्षिक आयोजनासाठी शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर जी नलावडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस.एम. एकतपुरे, प्रा. डी. एस. मेटकरी, (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग) यांचे मार्गदर्शन लाभले.

## खंडाळी जि.प. शाळेत भोंडल्याचा कार्यक्रम

सुराज्य/वेळापूर : खंडाळी (ता. माळशिरस) येथील जि. प. शाळेत भोंडल्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष व इतर सर्व सदस्य तसेच उपस्थित सर्व मातांनी हत्तीची पूजा करून बोंडला कार्यक्रमाची सुरुवात केली. छाया पोळ यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी व मातांना भोंडला या पारंपारिक सणाची माहिती दिली. कविता हिंगमिरे व शीतल बिराजदार यांनी उपस्थित सर्व मातांचे व विद्यार्थ्यांचे भोंडला या सणाचे पारंपारिक गाण्यासोबत पारंपारिक खेळही घेतले तसेच सर्वांनी विद्यार्थ्यांसोबत दांडिया खेळण्याचा आनंदही घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना खिरापतीचे वाटप करण्यात आले.

## वसंतराव नाईक महामंडळातर्फे कुसमोड येथील लाभार्थ्यांना कर्ज मंजूर

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील विस लाभार्थ्यांना वसंतराव नाईक भटक्या जाती व जमाती महामंडळातफे कृषी संलग्न व पारंपरिक लघु उद्योग व मध्यम उदयोग व्यवसायासाठी प्रत्येकी एक लाख रुपये प्रमाणे विस जणांना विस लाख रपये कर्ज मंजूर झाले आहे.

हे कर्ज बिनव्याजी आहे. या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सोलापूर जिल्हाचे भाजपा संघटन महामंत्री धैर्य शिल मोहीते-पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा युवा मोर्चाचे माळशिरस तालुका सरचिटणीस सतीश व्होनमाने, ग्रामपंचायत सदस्य पोपट कचरे, देवींदास धायगुडे, अनिल धायगुडे यांनी पाठपुरावा केला. कुसमोड येथील सर्व सामान्य लोकांची व्यवसायातुन सुधारणा व्हावी यासाठी जिल्हा अधिकारी मिलींद शंभरकर, महामंडळाच्या व्यवस्थापिका काळे मँडम यांच्या समीतीने सदरचे कर्ज मंजूर केले. सदरच्या योजनेतुन कर्ज मंजूर करण्यासाठी डॉ उत्तमराव सरगर, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब धायगुडे, महादेव बंडगर, नारायण चव्हाण, रमेश देशमुख, विकास सरगर, माजी सरपंच शशीकला लोखंडे, चंद्रकांत पवार, दादासाहेब पवार, अरुण पवार, विलास लोखंडे, जगदीश गायकवाड, बाळासाहेब कपने, दिगंबर चौगुले, सुनील बोडरे, बापु बोडरे, अक्षय मोरे, नितीन लेंगरे, नभाजी मदने, पोपट काळभोर यांचे विशेष सहकार्य लाभले.




## स्वच्छ सर्वेक्षण अभियानांतर्गत पंढरपूर नगरपालिकेस पुरस्कार

### आरोग्य निरीक्षकांच्या हस्ते स्वीकारला पुरस्कार

सुराज्य/पंढरपूर : स्वच्छ सर्वेक्षण -२०२२' अंतर्गत देशातील झालेल्या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला यावेळी देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते तलकोटरा स्टेडियम, नवी दिल्ली येथे बेस्ट परफॉर्मिंग स्टेट' चा तिस-या क्रमांकाचा पुरस्कार महाराष्ट्राला मिळाला असून विविध श्रेणींमध्ये राज्याला आज एकूण २३ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

केंद्रीय गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालयाच्यावतीने येथील तालकटोरा स्टेडियममध्ये स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२२' पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते विविध श्रेणीतील सर्वोत्तम १२ पुरस्कारांचे यावेळी वितरण करण्यात आले. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी विकास मंत्री हरदीपसिंह पुरी, राज्यमंत्री कौशल किशोर आणि सचिव मनोज जोशी यावेळी उपस्थित होते. पंढरपूर नगरपरिषदेला केंद्रीय गृहनिर्माण व शहरी राज्यमंत्री कौशल किशोर यांच्या शुभहस्ते पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी अरविंद माळी यांना पुरस्कार देण्यात आला यावेळी नगरपालिकेचे आरोग्य अधिकारी श्री शरद वाघमारे, श्री नागनाथ तोडकर, संतोष ऐतवाडकर, अभिजीत घाडगे आणि शहाजी चव्हाण हे उपस्थित होते. पंढरपूर नगरपालिकेला मिळालेला सन्मान हा पंढरपूर शहरातील प्रत्येक नागरिकाने यांनी या स्वच्छ सर्वेक्षण अभियानांतर्गत स्वच्छतेमध्ये दिलेल्या योगदानामुळे व नगरपालिकेच्या सांघिक प्रयत्नामुळे शक्य झाल्याची प्रतिक्रिया मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी यावेळी दिली.

> स्वच्छ सर्वेक्षण अभियानांतर्गत दिल्ली येथे पंढरपूर मिळालेला पुरस्कार मुख्याधिकारी अरविंद माळी यांच्या समवेत ग्राउंडवर काम करणारे आरोग्य निरीक्षक शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, संतोष ऐतवाडकर, अभिजित घाटगे, शहाजी चव्हाण उपस्थित होते. माझ्या सहकाऱ्यांनी केलेले कामांमुळे पंढरपुर नागरपालिकेचा सन्मान झाला आहे. त्यामुळे त्यांना सोबत घेऊन पुरस्कार स्वीकारला.
> – **अरविंद माळी,** मुख्याधिकारी



## पुरंदावडे येथील महालक्ष्मी मंदिर सभामंडप कामाचे भूमीपूजन

सुराज्य/अकलूज

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सेवा पंधरवडानिमित्त मौजे पुरंदावडे येथे आमदार फंडातून महालक्ष्मी मंदिर सभामंडप साठी ९ लाख %० हजार रुपये मंजूर कामाचे भूमिपूजन विधान परिषद आमदार रणजितसिह मोहिते पाटील व शिवामृत दुध संघांचे चेअरमन धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, जेष्ठ नेते गणपतराव वाघमोडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, माजी उपसभापती प्रतापराव पाटील, अर्जुनसिह मोहिते पाटील, रत्नत्रय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनंतलाल दोशी, माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल बापू वाघमोडे, माजी पंचायत समिती सदस्य बाळासाहेब लवटे, शंकर कारखान्याचे संचालक धोंडीराम नाळे, सरपंच देविदास ढोपे, उपसरपंच सुनीता पालवे, पोपट दादा गरगडे, प्रताप सालगुडे, पोलीस पाटील शेखर ओवाळ, शिवराज निंबाळकर, माजी उपसरपंच संतोष शिंदे, माजी सरपंच पोपट निंबाळकर, ज्ञानदेव निंबाळकर, बाळासाहेब सालगुडे, दादा तोडकरी, अनिकेत पवार, माजी सरपंच विष्णू ओवाळ, नारायण ऐवळे, वसंत ढगे, अप्पा गोरे, रामचंद्र गोरे, सोसायटीचे व्हा. चेअरमन दादा अर्जुन, सागर उरवणे, सागर ओवाळ, महादेव बोराटे ग्रामसेविका दीक्षित मॅडम व पुरंदावडे, येळीव, सदाशिवनगर गावातील ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.

## दसरा मेळाव्यास युवा सैनिक शिवतीर्थावर जाणार : इंगळे

सुराज्य/अकलूज : ५ ऑक्टोबर रोजी शिवसेनेचा ऐतिहासिक भव्य दसरा मेळावा शिवतीर्थावर शिवसेना पक्षप्रमुख उध्दवजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

युवा सेना प्रमुख आदित्यजी ठाकरे युवा सेना सचिव वरून सरदेसाई शिवसेना संपर्कप्रमुख अनिल कोकिळ युवा सेना विभागीय सचिव अक्षय ढोबळे युवा सेना राज्य विस्तारक उत्तम आयवळे यांच्या आदेशाने पंढरपूर सांगोला आणि माळशिरस या तालुक्यातून युवा सेनेचे पदाधिकारी युवासैनिक हजारोच्या संख्येने जाणार आहेत. अशी माहिती युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश इंगळे यांनी दिली. शिवसेनेचाच दसरा मेळावा शिवतीर्थावर होणार असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला त्याचवेळी सर्व युवा सैनिकांमध्ये नव चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

## गांधीजींनी माणूस बदलण्याचा प्रयत्न केला : प्रा. सुर्वे

सुराज्य/अकलूज

शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविदयालय अकलूज राष्ट्रीय सेवा योजना कार्यप्रसिध्द सप्ताह अंतर्गत महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती निमीत्त आयोजित गांधीजी समजून घेताना या चर्चा सत्रात प्रा. विष्णू सुर्वे बोलत होते. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील जेष्ठ प्राध्यापक डॉ. सुभाष शिंदे होते.

भारतातील अनेक नेत्यांनी, नेतृत्वाने व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला पण गांधीजींनी माणूस बदलण्याचा प्रयत्न केला त्यातुनच त्याचे सत्याचे प्रयोग, सत्याग्रह, अहिंसा या संकल्पना निर्माण झाल्या. समाजातल्या शेवटच्या माणसाचे हित डोळ्यासमोर ठेवूनच गांधीजीनी राष्ट्रीय कार्यक्रम जनतेला दिला त्यात ते यशस्वी झाले. म्हणूनच गांधी २१ शतकातील सर्वोत्तम नेता म्हणून निवडले गेले असे मत त्यांनी मांडले.

गांधीजी समजून घेताना या चर्चासत्रात सहभागी होत असताना गांधीजी व डॉ. आंबेडकर यांचे संबंध, नेताजी बोस यांचा संघर्ष, नेहरू गांधी संबंध, भारताची फाळणी, ५५ कोटी रूपये, गांधी हत्या, सरदार पटेल यांचे संबध यासोबतच महात्मा गांधीजी यांचे बद्दल असलेले अनेक गैरसमज व त्यांच्यावर होणारी टिका, गांधी विचार सदयकाळात कितपत योग्य आहेत याबाबत विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे मनात असलेल्या अनेक प्रश्नांची समर्पक उत्तरे प्रा. विष्णू सुर्वे, डॉ. विश्वनाथ आवड, डॉ. बाळासाहेब मुळीक, प्रा. स्वामीराज भिसे यांनी दिली.

चर्चासत्राचे प्रस्ताविक प्रा. दत्तात्रय मगर यांनी केले. तसेच कार्य प्रसिध्द सप्ताहात आयोजित केलेल्या रांगोळी व निंबध स्पर्धाचे बक्षीस वाचन प्रा. सज्जन पवार यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. चंकेश्वर लोंढे, जितेंद्र बाजारे, डॉ. चंद्रशेखर ताटे देशमुख, ग्रंथापाल दत्तात्रय पाटील, प्रा. हणमंत तेलसंग, ज्ञानेश्वर मगर उपस्थित होते.

## माळशिरसमधील मराठी तरुण प्रवर्तनतर्फे काश्मिरमध्ये सेवाकार्य

सुराज्य/श्रीपूर

प्रवर्तन फाऊंडेशननच्या माध्यमातून काश्मिर सिमावर्ती भागातील महिलांना शिवणकाम, शेवया करणे याचे प्रशिक्षण दिले जात असून संस्थेच्या माध्यमातून मशिन मोफत देण्यात येत आहे. स्वयंरोजगारातून स्वत:चीं गरज भागून तयार केलेला माल विकता येणार आहे पुढेही एल इ डी बल्ब तयार करणे, प्लंबिंगचे काम ' शिकवले जात आहे यातून अर्थचक्र फिरण्यास मदत होणार आहे.

जीव मुठीत धरूनच जीवन जगावे लागणाऱ्या काश्मिरी लोकांसाठी आपण काय करु शकतो असा विचार येथिल महाळुंग नगर पंचायतीचे नगरसेवक निनाद पटवर्धन यांना स्पर्श करून गेला. कॉलेज जीवनात बट्ट नावाच्या कश्मिर मधील मित्रांची मैत्री झाली. व त्याचे बरोबर कश्मिरला जाणे झाले व तिथली परिस्थिती समजली व विचार चमकुन गेला आपण काय करू शकतो.

या भागात सेवाकार्य करणे म्हणजे तितकेच जिकिरीचे कारण विशेष करून सिमावर्ती भागात लष्करा शिवाय जाऊ शकत नाही. परंतु मनात




निश्चय असल्याने लष्करातील अधिकारी कॅप्टन देशपांडे, मेजर आनंद, कर्नल रणबिरसिंग, ब्रिग्रेडर विनोद सिंगनेरी, सुभेदार लक्ष्मण पाटील, यांचा संपर्क झाला. आम्ही या ठीकाणी सेवा कार्य करणेस इच्छुक असल्याचे सांगितले. यावर त्यांच्या कडून सकारात्मक प्रतिसाद आल्यावर कामास सुरुवात झाली. सुरुवातीस शाळेतील मुलांमध्ये क्रिकेट स्पर्धा घेतल्या यामधून मुलं व पालकांमध्ये विश्वास निर्माण होत गेला. यातूनच पुढे स्वयंरोजगाराचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे या प्रयत्नांना यश येवू लागले. अर्थात क्षेत्र मोठे आहे त्यामानाने आमचे काम खारींचा वाटा असणारेच आहे. आज पर्यत स्वतःचे पैस खर्च करुन सुमारे २७०० कि. मी दूर असलेल्या रिमबाला, चक्कि, डुड्डी, या सिमावर्ती भागात काम चालु आहे. कश्मिरींचा प्रतिसाद व मागणी वाढत आहे. बरेच दानशुर भेटत आहेत परंतू काम मोठे आहे त्यामुळे अर्थकारण व स्वयंसेवक वाढणे गरजेचे आहे. त्यामुळे याकामी मदतीची अपेक्षा आहे. आज आपलेच असणारे परंतु काही राष्ट्र विरोधी शक्ती आपल्यात फूट पाडून त्यांच्यात अलगतेची भावना निर्माण करत आहेत त्याचे षडयंत्र हाणून पाडणेसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याची भावना प्रवर्तन फाऊंडेशनची आहे. या अभियानात जास्तीत जास्त लोकांचा अर्थकारणासह सहभाग अपेक्षित आहे. प्रवर्तन फाऊंडेंशनला जोडण्यासाठी निनाद पटवर्धन (९४२०३०१५०२ ) व संजय मोकाशी (९४२१०६१२२४) यांचेशी संपर्क साधावा असे अवाहन करण्यात आले आहे.

> **माळशिरस तालुक्यातील निनाद पटवर्धन, संजय मोकाशी' श्रीपाद कुलकर्णी, शाम मांगले, मोहन कवडे, (सर्व श्रीपूर), सचिन शिन्दे, संकेत कुलकर्णी, संदीप खंडागळे, (सर्व अकलूज) व पुणे येथिल शुभम कातंगळे हे युवक गेल्या ४ ते ५ वर्षांपासून कश्मिरमध्ये स्वखर्चाने सेवाकार्य करत आहेत.**

# ‘जीएसटी’ संकलन १.४७ लाख कोटींवर

## सप्टेंबरमध्ये २६ टक्के वाढ; दिवाळीतील करविस्तारासाठी शुभसूचक

सुराज्य/सोलापूर

**वस्तू व सेवांच्या दरवाढीसह, त्यांची बळावलेली मागणी आणि व्यापाऱ्यांकडून वाढलेले कर-अनुपालन आणि सणासुदीच्या हंगाम याच्या एकत्रित परिणामामुळे सरलेल्या सप्टेंबरमध्ये वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी संकलन हे १.४७ लाख कोटी रुपयांवर गेले आहे. मागील वर्षातील याच तिमाहीच्या तुलनेत संकलनात २६ टक्क्यांची वाढ झाली असून, ती आगामी सणासुदीच्या महिन्यांमधील कर संकलनात वाढीच्या दृष्टीनेदेखील आश्वासक व शुभसूचक मानली जात आहे.**




सप्टेंबरमधील संकलन हे ऑगस्टमध्ये झालेल्या १.४३ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक राहिले आहे. मागील सलग सात महिन्यांत जीएसटी संकलन हे १.४० लाख कोटी रुपयांच्या वर राहिले आहे. हे जीएसटी संकलनातील स्थिरता दर्शवते आहे. चालू महिन्यात दिवाळी असल्याने या महसुली प्रवाहाला आणखी बळ मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच जागतिक पातळीवरील इतर देशांच्या तुलनेत अर्थव्यवस्थेची स्थिती समाधानकारक असल्याने जीएसटी महसुलावर सातत्यपूर्ण आधारावर सकारात्मक प्रभाव पडत आहे, असे केंद्रीय अर्थ मंत्रालयाने या संबंधीच्या निवेदनात म्हटले आहे.

चालू आर्थिक वर्षात एप्रिल २०२२ मध्ये विक्रमी १.६७ लाख कोटी रुपयांचे संकलन झाले आहे.

सरलेल्या सप्टेंबर २०२२मध्ये गोळा झालेला एकत्रित जीएसटी महसूल १,४७,६८६ कोटी रुपये आहे. यंदाच्या एकत्रित कर महसुलात, केंद्रीय वस्तू व सेवा करापोटी २५,२७१ कोटी रुपये, राज्य वस्तू व सेवा करापोटी ३१,८१३ कोटी रुपये, तर एकात्मिक वस्तू व सेवाकरापोटी ८०,४६४ कोटी रुपये (आयात वस्तूंवर गोळा केलेल्या ४१,२१५ कोटी रुपयांसह) आणि १०,१३७ कोटी रुपये उपकरातून (माल आयातीवर जमा झालेल्या ८५६ कोटी रुपये उपकरासह) गोळा झाले आहेत, असे अर्थ मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

### राज्यातील संकलनात अडीच हजार कोटींनी वाढ

राज्यातील वस्तू आणि सेवा कराच्या (जीएसटी) संकलनात ऑगस्टच्या तुलनेत सप्टेंबरमध्ये अडीच हजार कोटींनी वाढ झाली आहे. सणासुदीच्या काळात राज्याची अर्थव्यवस्था अधिक गतिमान होईल, असा विश्वास राज्याच्या वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. राज्यात सप्टेंबरमध्ये वस्तू आणि सेवा कराचे २१,४०३ कोटी रुपये एवढे संकलन झाले. ऑगस्टमध्ये १८,८६३ कोटी रुपयांचे संकलन झाले होते. जुलैच्या तुलनेत ऑगस्टमधील संकलनात सुमारे तीन हजार कोटींनी घटले होते, परंतु सप्टेंबरमध्ये पुन्हा संकलन चांगले झाले आहे.

राज्यात सरासरी २० हजार कोटींपेक्षा अधिक मासिक संकलन होते. ऑगस्टमध्ये मोठा फटका बसला होता. आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर घटल्याचा फायदाही राज्याच्या संकलनावर झाल्याची माहिती वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. सणासुदीच्या काळात खरेदी वाढते. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या काळात अधिक संकलन होण्याचा अंदाज आहे. सप्टेंबर २०२१ मध्ये राज्यात १६,५८४ कोटी रुपयांचे संकलन झाले होते. यंदा हेच संकलन २१.४०३ कोटी झाले. म्हणजेच २९ टक्के वाढ झाली आहे. कोरोनाकाळातून तेव्हा राज्य बाहेर पडत होते. आता आर्थिक व्यवहार सुरळीत झाले आहेत. वस्तू आणि सेवा कराच्या संकलनात देशात महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर आहे. सप्टेंबरमध्ये कर्नाटक (९७६० कोटी), गुजरात (९,०२० कोटी), तमिळनाडू ( ८,६३७ कोटी) संकलन झाले आहे.



### चांदणी चौकातील वाहतूक ११ तासांनी पूर्ववत

सुराज्य/पुणे : चांदणी चौकातील पूल स्फोटकांनी पाडण्यात आल्यानंतर अकरा तासांनी बाह्यवळण मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. सकाळी दहाच्या सुमारास या भागातील वाहतूक पूर्ववत झाली.

मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील जुना पूल मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास स्फोट घडवून पाडण्यात आला. पूल पाडण्यासाठी ६०० किलो स्फोटकांचा वापर करण्यात आला. शनिवारी (१ ऑक्टोबर) बाह्यवळण मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात आला. या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. रात्रीपासून या भागात पोलिसांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले होते. रात्री दहानंतर या भागातील वाहतूक थांबविण्यात आली.



### नवरात्रौत्सवात मोठ्या प्रमाणात नारळांना मागणी

सुराज्य/पुणे : नवरात्रौत्सवात नव्या नारळाला मागणी वाढली आहे. मार्केट यार्डातील भुसार बाजारात दररोज दीड ते दोन लाख नारळांची आवक सध्या होत आहे. नवरात्रौत्सवात भाविकांकडून तोरण वाहिले जाते. तोरणासाठी नव्या नारळाचा वापर केला जातो. कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूतून नारळाची आवक मार्केट यार्डातील भुसार बाजारात होते. गणेशोत्सवानंतर नवरात्रौत्सवात नारळांच्या मागणीत वाढ होते. नवरात्रौत्सवात देवीच्या मंदिरात तोरण वाहण्याची प्रथा आहे. उपवासाचे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी नारळाला मागणी वाढते, असे मार्केट यार्डातील नारळ व्यापारी दीपक बोरा यांनी सांगितले.

### ग्राहकांसाठी मुदत विमा योजना

सुराज्य/मुंबई : एचडीएफसी लाइफने क्लिकटूप्रोटेक्ट सुपर या नावाची मुदत विमा योजना आणली आहे. श्रीनिवासन पार्थसारथी म्हणाले, ‘कस्टम यझेशनच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात लवचिकता देऊ करणारी नवोन्मेषकारी उत्पादने ग्राहकांपुढे आणणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

## गरबा कार्यक्रमात केजरीवालवर फेकली पाण्याची बाटली

सुराज्य/गुजरात

**गुजरात निवडणुकीच्या अगोदर आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी काल(शनिवार) गांधीधाम आणि जुनागढमध्ये जाहीर सभांना संबोधित केले. याशिवाय या दौऱ्यात अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी गरबा कार्यक्रमासही हजेरी लावली असता, कार्यक्रमस्थळी असलेल्या गर्दीमधून कोणतरी अरविंद केजरीवाल यांच्यावर पाण्याची बाटली फेकली. या घटनेचा व्हिडिओही समोर आला असून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**

प्राप्त माहितीनुसार राजकोट येथील खोडलधाम गरबा कार्यक्रमात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी उपस्थिती लावली होती. याचवेळी गरबा कार्यक्रमासाठी आलेल्यांपैकी कोणीतरी केजरीवालांवर पाण्याची बाटली फेकली. ही बाटली नेमकी कोणी फेकली हे समजू शकले नाही, त्याचा शोध सुरू आहे.



### शहर स्वच्छतेत महाराष्ट्र देशात तिसरा

सुराज्य/मुंबई

केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छ सर्वेक्षणात इंदूर शहराने सलग सहाव्यांदा प्रथम क्रमांक कायम राखला, तर सुरत आणि नवी मुंबई यांनी अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकावला. तसेच महाराष्ट्र देशातील तिसरे स्वच्छ राज्य ठरले.

‘स्वच्छ भारत मिशन (नागरी)’ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२’चा निकाल शनिवारी जाहीर करण्यात आला. त्यानुसार, स्वच्छतेबाबतची ‘उत्तम कामगिरी’ या श्रेणीत आपले पहिले स्थान मध्य प्रदेशने कायम राखले तर छत्तीसगड आणि महाराष्ट्र अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाची स्वच्छ राज्ये ठरली. दुसरीकडे शंभरहून कमी स्वराज्य संस्था असलेल्या राज्यांच्या श्रेणीत त्रिपुरा अव्वल ठरले.

## इम्रान खान यांच्याविरोधात अटक वॉरंट

सुराज्य/इस्लामाबाद

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान तहरीक ए इन्साफ (पीटीआय) पक्षाचे नेते इम्रान खान यांच्याविरोधात अटक वॉरंट बजावण्यात आले आहे. जाहीर सभेत आक्षेपार्ह विधाने केल्याचा खान यांच्यावर आरोप आहे.**



२० ऑगस्ट रोजी झालेल्या सभेत खान यांनी केलेल्या भाषणाविरोधात तक्रार दाखल झाली होती. अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश झेबा चौधरी यांच्यासह एका महिला अधिकाऱ्याबाबत आक्षेपार्ह विधाने करून धमकावल्याचा आरोप आहे. याबाबत खान यांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र दिले. आपण २० तारखेच्या सभेत सीमारेषा ओलांडल्याची जाणीव आहे. यापुढे असे वर्तन होणार नाही,’ असे खान यांनी लिहून दिले. मात्र, त्यानंतर थोड्याच वेळात सदर न्यायालयाने खान यांच्याविरोधात वॉरंट बजावले.

दरम्यान, हे वॉरंट बजावण्यात आल्यानंतर खान यांच्या घराबाहेर पीटीआय पक्षाचे कार्यकर्ते जमण्यास सुरूवात झाल्याचे वृत्त काही पाकिस्तानी माध्यमांनी दिले.

### बिहारमधील आणखी एका मंत्र्याची विकेट

सुराज्य/वॉशिंग्टन

बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळातील कृषी सुधाकर सिंह यांनी राजीनामा दिला आहे. सुधाकर सिंह हे नव्या सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळं चर्चेत आला होते. राजदचे बिहार प्रदेशाध्यक्ष जगदानंद सिंह यांनी याबाबत माहिती दिली आहे. जगदानंद सिंह हे सुधाकर सिंह यांचे वडील देखील आहेत.



सुधाकर सिंह त्यांच्या एका वक्तव्यामुळे बिहारमध्ये वाद निर्माण झाला होता. सुधाकर सिंह यांनी कैमूरमधील सभेत बोलताना कृषी विभागात अनेक चोर आहेत, त्या चोरांचा मी सरदार आहे, माझ्यापेक्षा वरच्या पातळीवर आणखी चोर आहेत, असं सुधाकर सिंह म्हणाले.

## वादळामुळे अमेरिकेत ३० जणांचा मृत्यू

सुराज्य/वॉशिंग्टन

**अमेरिकेत आलेल्या इयान या शक्तिशाली वादळाने अमेरिकेत फ्लोरिडा, दक्षिण कॅरोलिना येथे मोठा विध्वंस केला. आतापर्यंत आलेल्या विध्वंसकारी वादळांपैकी एक असलेले हे वादळ कमजोर झाले असून, अमेरिकेच्या उत्तरेकडे उत्तर कॅरोलिनाकडे ते जात आहे. या वादळाने पश्चिम क्यूबातही मोठे नुकसान झाले.**




या वादळामुळे झालेल्या दुर्घटनेत फ्लोरिडात सुमारे ३० जण मृत्युमुखी पडले आहेत. वादळामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याने प्राणवायू पुरवठा करणारे यंत्र बंद झाल्याने एका ज्येष्ठ नागरिक दांपत्य मृत्युमुखी पडले. या वादळामुळे झालेल्या मुसळधार पावसात अनेक घरे पाण्याखाली गेली असून, रस्त्यांवर पाणी साचले आहे. एक २२ वर्षीय तरुणी रस्त्यावरील साचलेल्या पाण्याखालील मोठा खड्डा न कळाल्याने त्यात बुडून मृत्युमुखी पडली.

एका ७१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाच्या डोक्यात छताचा भाग पडल्याने ते मृत्युमुखी पडले. अनेक जण पाण्यात वाहून गेल्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

फ्लोरिडाचे प्रांतपाल रॉन डिसॅन्टिस यांनी सांगितले, की युद्धपातळीवर मदतकार्य आणि पूरग्रस्तांची सुटका केली जात आहे. प्रचंड वित्तहानी झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.



### मुख्यमंत्री शिंदे यांच्या जीवाला धोका

सुराज्य/मुंबई : गेल्या काही दिवसांपासून मुंबईला उडवून देण्याची धमकी मिळत असताना आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. आत्मघातकी स्फोट घडवून एकनाथ शिंदेंविरोधात कट रचला असल्याची माहिती गुप्तचर विभागाला मिळाली असल्याचं सूत्रांकडून सांगण्यात येतंय. दरम्यान, याआधी आषाढी एकादशीलाही त्यांना नक्षलवाद्यांकडून धमकीचा फोन आला होता.

मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी सुरक्षाव्यवस्था नाकारली होती. मात्र, शासकीय नियमानुसार त्यांना झेड प्लस सुरक्षा देण्यात आली आहे. दरम्यान त्यांना आता धमकीचा फोन आल्याने सुरक्षा यंत्रणा आणखी सक्रीय झाल्या आहेत. तसेच, आता त्यांची सुरक्षा आणखी चोख करण्यात येणार असल्याचे समजत आहे.

### अवघ्या ३५ मिनिटांत दुसरे हृदय उपलब्ध

सुराज्य/ठाणे: जिल्ह्यातील हृदयप्रत्यारोपणाची पहिलीच शस्त्रक्रिया ज्युपिटर रुग्णालयाने यशस्वी केली असून कोकणातील ३९ वर्षीय एसटी कर्मचाऱ्याला चक्क दुसरे हृदय लावण्याची किमया केली आहे, अशी माहिती ज्युपिटर रुग्णालयाचे डॉक्टर नितिन बुरकुले यांनी दिली आहे.

ही अवघड शस्त्रक्रिया डॉ. प्रविण कुलकर्णी, डॉ. सौम्य शेखर यांच्या मार्गदर्शनाखाली ८ वरील हृदयरोग तज्ज्ञांनी पार पडल्याचे रुग्णालयाच्या सीईओ डॉ. शिल्पा ताटके यांनी सांगितले. दरम्यान कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भिकाजी निर्गुण हे रुग्ण एसटी कर्मचारी असून जीवदान दिल्याबद्दल त्यांनी तसेच त्यांच्या कुटुंबियांनी रुग्णालयाचे आभार मानले आहेत.



### गुंतवणूकदारांना लाखोंचा गंडा

सुराज्य/पुणे : गुंतवणुकीवर भरभक्कम परतावा देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांना गंडा घातल्या प्रकरणी पाच जणांविरोधात येथील शाहूपुरी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये विश्वास निवृत्ती कोळी (वय ४५, रा. बावची, ता. वाळवा) याचा समावेश आहे. विश्वास कोळी याने ग्रोबज ट्रेडिंग सर्विसेस नावाची कंपनी सुरू केली होती. त्यामध्ये गुंतवणूक केल्यास १० महिन्यात १५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून लोकांनी गुंतवणूक केली होती.

## धनुष्य पवारांच्या हाती अन् ठाकरे प्रचंड आशावादी, ‘साहेबांच्या’ हाती धनुष्यबाण, वळसे-पाटलांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य!

सुराज्य/जुन्नर (पुणे)

**धनुष्यबाण कुणाचा? या प्रश्नाचे उत्तर अद्याप महाराष्ट्राला मिळालेले नसताना आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हाती 'धनुष्यबाण' स्थिरावला. एकनाथ शिंदे यांनी पक्षनेतृत्वाविरोधात भूमिका घेऊन भाजपशी नवा संसार थाटत राज्यात नवे सरकार स्थापन केले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी संपूर्ण शिवसेना पक्षावर दावा सांगितला.**

पर्यायाने पक्षचिन्हाचा प्रश्न उभा ठाकलेला असताना तसेच न्यायालयीन लढाई सुरु असताना त्यांनी निवडणूक आयोगाकडेही धाव घेतली. पुढच्या काही दिवसांत धनुष्यबाण कुणाला? या प्रश्नाचं उत्तर मिळणार आहे. पण आज राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हाती 'धनुष्यबाण' विसावला. त्याला कारण ठरला आदिवासी समाज प्रबोधन मेळावा!



आज जुन्नरच्या लेण्याद्रीमध्ये वीर आदिवासी मावळ्यांच्या बलिदानाचं स्मरण करण्यासाठी आदिवासी समाज प्रबोधन मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्याबरोबर या कार्यक्रमाला माजी गृहमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते दिलीप वळसे पाटील, शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, अकोलेचे आमदार डॉ. किरण लहामटे, खेडचे आमदार दिलीप मोहिते पाटील, जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांची उपस्थिती होती.

वीर आदिवासी मावळ्यांच्या बलिदानाची शौर्यगाथा उपस्थित मान्यवरांनी वाचली. आदिवासी समाजातील वीरांचे आणि त्यांच्या कथांचं शरद पवार यांनी स्मरण केलं. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झालेले असतानाही आदिवासी समाज अजूनही मुख्य प्रवाहात आला नसल्याची खंत यावेळी पवारांनी बोलून दाखवली. त्यासाठी रचनात्मक कामाची गरज असल्याचे पवार यांनी म्हटले आहे. यावेळी आदिवासी समाज बांधवांनी शरद पवार यांचा पारंपारिक सत्कार केला. शरद पवार यांना पुष्पगुच्छ देताना त्यांना धनुष्यबाणही दिला. धनुष्यबाण हाती घेताच पवार यांनी तो उंचावत आदिवासी समाजाने केलेला सन्मानाला दाद दिली. यावेळी पवार यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्टपणे दिसत होता. शेजारी उभे असलेले दिलीपराव वळसे-पाटीलही पवारांकडे बघून स्मितहास्य करत होते.

## फुटबॉल मैदानावर चाहत्यांचा राडा; इंडोनेशियात १७४ जणांचा मृत्यू

सुराज्य/इंडोनेशिया

**इंडोनेशियातून एक धक्कादायक वृत्त समोर आलं आहे. फुटबॉल सामन्यादरम्यान हिंसाचार घडला आहे. या हिंसाचारात १७४ जणांचा मृत्यू झाला असून, १८० च्यावरती लोक गंभीर जखमी झाले आहेत. इंडोनेशियातील पूर्व जावा भागात ही घटना घडली आहे. याबाबत पोलिसांनी माहिती दिली आहे.**



रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, अरेमा एफसी आणि पर्सेबाया सुराबाय यांच्यादरम्यान सामना रंगला होता. मात्र, सामन्यात पर्सेबाया सुराबाय संघाने अरेमा एफसीवर मात करत ३-२ ने सामना जिंकला.

या सामन्यानंतर पराभूत झालेल्या अरेमा एफसी संघाच्या चाहत्यांनी मैदानावर येत गोंधळ घातला. यावेळी नाराज चाहत्यांना हुसकवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या कांड्याचा मारा केला. त्यामुळे मैदानातील चाहत्यांमध्ये धावपळ उडाली आणि चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या. या दुर्घटनेत १७४ जणांच्या मृत्यू झाला तर अनेक गंभीररित्या जखमी झाले आहे. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या घटनेनंतर इंडोनेशिया बीआरआई लीगचे सर्व सामने एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आले आहेत.

# तरुण तुर्क... उमेदवारीचे रणांगण म्हातारे अर्क...





✔ सुराज्य/शिवाजी भोसले

राज्यासह देशाच्या राजकीय पटलावर आजवर विविध कारणांमुळं चर्चेत राहिलेल्या सोलापूर लोकसभा मतदार संघात या खेपेला कोणते चित्र राहील, या संदर्भातील चर्चेचे धुमशान या मतदार संघात सुरु आहे. मुख्य म्हणजे मागच्या दोन वेळेच्या पराभवाचा वचपा काढत, या खेपेला विजयश्री खेचून आणून टर्म पूर्ण केल्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे हे राजकीय सेवानिवृत्ती घेणार की आपली राजकीय वारसदार म्हणून दिल्लीच्या संसदेत पाठविण्यासाठी आमदार कन्या प्रणितींना या मतदार संघात लोकसभेला उभे करणार? या प्रश्नांभोवती चर्चेचे वादळ आहे. दुसरीकडे आरक्षित सोलापूर लोकसभा मतदार संघात खासदारकी लढवण्यासाठी माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे हे 'ढोबळ' मानाने नव्हे तर, खऱ्या अर्थाने लोकसभा लढवण्यासाठी तयारीला लागले आहेत. सोलापूरच्या खासदारकीच्या महासंग्रामात बडे प्रस्थ सुशीलकुमार शिंदे उतरले तर त्यांच्याविरोधात शड्डू ठोकण्यासाठी स्वत: ढोबळे सज्ज आहेत, सुशीलकुमार यांच्याऐवजी प्रणिती शिंदे या लोकसभेच्या रणांगणात उतरल्या तर त्यांना शह देण्यासाठी ढोबळे हे आपली कन्या कोमल साळुंके-ढोबळे यांना रणांगणात उतरविण्याच्या तयारीत आहेत. स्वत:ला किंवा कन्येला लोकसभेची उमेदवारी मिळवण्यासाठी लक्ष्मणराव हे प्रयत्नशील आहेत. सोलापूर लोकसभेसाठी काँग्रेसकडून शिंदे पिता किंवा कन्या अथवा भाजपकडून ढोबळे पिता किंवा कन्या असेच दोन प्रमुख पक्षांच्या उमेदवारीचे चित्र राहू शकते.



### ढोबळे देऊ शकतात टस्सल पण...

दलित चेहरा, राजकारणामधील प्रचंड मोठा अनुभव, फर्डे वक्तृत्व, शिक्षण सम्राट, दलित मतांची मोठी वोट बँक पाठीशी येण्याइतपर्यंतचे नेतृत्व शिवाय सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'मनी' पॉवर या सगळ्या फॅक्टरवर लक्ष्मणराव यांची उमेदवारी सक्षम होऊ शकतं, असं राजकीय विश्लेषकांना वाटते. काँग्रेसकडून सुशीलकुमार शिंदे यांची उमेदवारी राहिल्यास ढोबळे हे त्यांना चांगली टस्सल देऊ शकतात, असं विश्लेषकांचेही मत आहे. पण भाजपची उमेदवारी देण्याचे धोरण भयावह आणि तितकीच अनपेक्षित आहेत. पक्षाच्या निष्ठावंतांचा उमेदवारी देताना पहिल्यांदा विचार होतो. ढोबळे हे इतर पक्षातून आलेले आहेत. तेव्हा पक्षामधील एखाद्या निष्ठावंत चेहऱ्याच्या हातात उमेदवारीचे कमळ ठेवायची की आपल्या पक्षाच्या वळचणीला आलेल्या नेतृत्वाच्या हातात कमळ द्यायचे याची सूक्ष्म पडताळणी करून भाजपच्या उमेदवारीचा विचार होऊ शकतो. शिवाय या मतदार संघात मोठ्या प्रमाणात असलेली लिंगायत, मुस्लीम, मराठा या समाजाची वोट बँक ढोबळेंच्या किती पाठीशी येणार? मोदी लाट असणार का? ही सगळी गणितंदेखील ढोबळेंच्या उमेदवारीच्या पार्श्वभूमीवर, अत्यंत महत्त्वाची आहेत.

### प्रणितींच्या तुलनेत कोमलताईंच्या नेतृत्वाचा कस

तरूणाईला संधी देण्याच्या धोरणाचा विचार करता लक्ष्मणराव यांची कन्या कोमल ढोबळे यांना सोलापूर लोकसभेची उमेदवारी देण्याच्या विचार होताना त्यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. पिताश्री लक्ष्मण ढोबळे यांच्या नेतृत्वाचे मोठे वलय त्यांच्याबाबतीत अत्यंत जमेची बाब असली, तरी वैयक्तिक नेतृत्वाच्या आघाडीवर कोमल यांचे नेतृत्व खुजे पडू शकते. कारण त्या तुलनेत काँग्रेसकडून आमदार प्रणिती शिंदे यांची उमेदवारी असल्यास प्रणितींपुढे कोमल साळुंके या राजकीय अनुभवाच्या पर्यायाने प्रत्यक्ष निवडणुका लढण्याच्या आघाडीवर अत्यंत नवख्या ठरू शकतात. सुशीलकुमार शिंदे यांचे राजकीयसह सर्वच क्षेत्रातील नेतृत्वाचे वलय प्रणितींसाठी जमेची बाजू आहे. दुसऱ्या बाजूला खुद्द प्रणिती यांनी स्वत:देखील आपल्या कर्तृत्वातून झंझावाती वादळी नेतृत्व उभे केले आहे. प्रणिती शिंदे या राज्याचे नेतृत्व करू शकतात इतके, कर्तृत्व आणि सक्षमता त्यांच्याकडे आहे. विधानसभेचे तीन टर्म त्यांनी नेतृत्व केले आहे, त्यातून लोकसभेसाठी त्या खूप सक्षम आहेत, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

### वाटतील ताटात... अन् ताटातील वाटीत... बस्सं एवढेच

सोलापूरचे सुपुत्र म्हणून देशाचे नेतृत्व करणाऱ्या सुशीलकुमारांनी आपली राजकीय वारसदार आमदार कन्या प्रणिती शिंदे यांच्या शिवाय म्हणजेच शिंदे परिवारातल्याशिवाय दुसरे बाहेरचे नेतृत्व तयार होऊ दिले नाही, असा आरोप सुशीलकुमार शिंदे यांच्यावर आजही होतो. हाच धागा पकडून राजकीय जाणकारांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. सोलापूर लोकसभेसाठी सुशीलकुमार आणि प्रणिती यांच्याशिवाय दुसऱ्या नेतृत्वाचा पर्याय नाही. सुशीलकुमारांनी बाहेरचे एखादे सक्षम नेतृत्व तयार केले असते तर आज सोलापूर लोकसभेसाठी शिंदे परिवाराशिवाय उमेदवारीसाठी दुसरा सक्षम पर्याय दिसला असता वाटातील ताटात आणि ताटामधील वाटीत अशीच सुशीलकुमारांची नेतृत्व तयार करण्याच्याबाबतीत दूरदृष्टी राहिली असे राजकीय विश्लेषक सांगतात.

### सुशीलकुमारांशिवाय दुसरे तगडे कोण ?

सोलापूर लोकसभा मतदार संघात काँग्रेसकडून सुशीलकुमार शिंदे हेच सक्षम उमेदवार होऊ शकतात, खुद्द त्यांचा आणि कन्या प्रणिती शिंदे यांच्या उमेदवारींचा विषय बाजूला केला, तर आरक्षित सोलापूर लोकसभा मतदार संघासाठी काँग्रेसकडून कोणता दलित तगडा चेहरा उमेदवारीसाठी असू शकतो? या प्रश्नाभोवती चर्चा फिरते. ८२ वर्षाचे सुशीलकुमार आता लोकसभेच्या आखाड्यात उतरतील का? तरूणाईला संधी देण्याच्या धोरणात ज्येष्ठ नेतृत्व सुशीलकुमारांना पक्षाकडून उमेदवारी मिळणार का? शिवाय सुशीलकुमार हेच या खेपेची लोकसभेची निवडणूक लढण्यावर स्टीकअप नाहीत. आपल्या सेवानिवृत्तीबाबतीत ते नेहमीच कुठे ना कुठे बोलत असतात. शिवाय पराभव झाल्यापासून ते आपल्या लोकसभेच्या मतदार संघातील मतदारांच्या संपर्कात नाहीत. अनेक जबाबदाऱ्या प्रणिती शिंदे यांच्याकडे सोपवून ते विविध आघाड्यांवर नामानिराळे राहण्याचा त्यांचा जाणीवपूर्वक प्रयत्न दिसला. हे सगळे पाहता, सोलापूर लोकसभेच्या काँग्रेसच्या उमेदवारीबद्दल ठोस सांगणे अवघड आहे.

### प्रणितींच्या निर्णयावर उमेदवारीची गणितं

प्रणिती शिंदे यांना राज्याच्याच नेतृत्वात स्वारस्य असावे. त्यातूनच त्यांनी आपल्या विधानसभेच्या मतदार संघावर लक्ष केंद्रित ठेवले आहे. शिवाय महत्त्वाचे म्हणजे काँग्रेस पक्षामधील संघटनात्मक पातळीवरची साधारण ८ पदे त्यांनी स्वीकारली आहेत. या पदांवर त्यांचे अत्यंत प्रभावी काम सुरु आहे. प्रणिती शिंदे या विधानसभेचीच निवडणूक लढवतील, असे नक्की आहे. त्यांनी लोकसभेला लढण्यास नकार दिल्यास काँग्रेस पक्षाच्या उमेदवारीसाठी सुशीलकुमारांचे नाव पुढे येणार. बदलत्या धोरणानुसार, तरुणाईला निवडणुकांच्या उमेदवाऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचा काँग्रेस पक्षाचा नवा अजेंडा लक्षात घेतला, तर प्रणिती शिंदे यांच्या एवढा तगडा स्थानिक चेहरा उमेदवारीसाठी कोणताच नाही. प्रणिती शिंदे यांना लोकसभा लढण्याचा आग्रह खुद्द काँग्रेस पक्षाकडून धरला जाऊ शकतो. काँग्रेसने प्रणितींची उमेदवारी कायम ठेवायची ठरविल्यास भाजपला प्रणितींना टस्सल देणारा उमेदवारीचा चेहरा शोधावा लागू शकतो. हा चेहरा शोधताना ढोबळे यांच्या कन्या कोमल यांचे नाव ओघाने नव्हे तर निश्चित पुढे येऊ शकते एवढेच नाहीतर आणले जाणार आहे.

### सामाजिक संतुलन आघाडीवर ढोबळेंचा विचार

भाजप पक्षानेदेखील आपले धोरण बदलले आहे. समाजामधील सर्व घटकांना सामावून घेण्याचा भाजपचा नवा फंडा आहे, या फंड्याचा, धोरणाचा विचार करता, लक्ष्मण ढोबळे या दलित चेहऱ्याचा लोकसभेवेळी भाजप नक्की विचार करू शकतो. कारण लक्ष्मणराव ढोबळे या दलित चेहऱ्याचे महाराष्ट्राच्या दलित चळवळीत काम आहे, ढोबळे यांना सोलापूर लोकसभेसाठी संधी दिली आहे, दलित समाजाला न्याय दिला, आपल्या समाजाच्या नेतृत्वाला न्याय दिला आहे, असा मॅसेज भाजपच्याबाबतीत राज्यात दिला जाऊ शकतो, त्यातून राज्यामधील दलित मतांची ताकद भाजपच्या पाठीशी उभी राहू शकते, लोकसभेला ही ताकद उभा राहिल्यास, विधानसभेलादेखील हाच दलित समाज भाजपच्या पाठीशी येईल हे दलित मतांच्या गोळाबेरजेचे गणित घालता महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुका भाजपकडून लढवल्या जाताना, सोलापूर लोकसभेच्या निवडणुकीसाठी लक्ष्मणराव ढोबळे किंवा त्यांची राजकीय वारसदार कन्या कोमल साळुंके - ढोबळे यांच्या नावाचा विचार होऊ शकतो, असेही राजकीय विश्लेषकांना वाटते.

### उमेदवारीसाठी कोमल साळुंके आहेत सक्षम ?

महाराष्ट्रामधील दलित चळवळीमधील आघाडीचा चेहरा, अनुभवी नेतृत्व, राजकारणात स्वत:चे वेगळे वलय त्याशिवाय शिक्षण सम्राट अशी ख्याती असलेल्या लक्ष्मणराव ढोबळे यांच्या कन्या कोमल साळुंके - ढोबळे या आहेत. पुण्यात वास्तव्यास असलेल्या कोमल या बहुजन रयत परिषदेच्या महिला आघाडीच्या त्या प्रदेशाध्यक्षा आहेत. या संघटनेच्या माध्यमातून त्यांचे महाराष्ट्रभर काम आहे. त्यांचे संघटनात्मक पातळीवरचे मोठे नेटवर्क आहे. सोशल मिडीयाचा फंडा खुबीने वापरत त्यांनी काम चालू ठेवले आहे. सामाजीक, शैक्षणिक आघाडीवर त्यांचे जोरदार काम आहे.

## स्व. सातलिंगप्पांचे आयुष्य जनसेवेसाठी समर्पित होते

### डॉ. जयशांतलिंगेश्वर महास्वामी यांचे प्रतिपादन

### दुधनीत लसीकरण मोहीमेला मोठा प्रतिसाद

✔ सुराज्य/अक्कलकोट



स्वत:साठी जगणाऱ्या माणसांपेक्षा इतरांसाठी जगणाऱ्या माणसांना समाजात मोलाचे स्थान असते. अशी माणसेदेखील दुर्मिळ असतात. दुधनीच्या जनतेसोबतच महाराष्ट्र, कर्नाटकातील जनतेसाठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यांचे संपुर्ण आयुष्य हे जनसेवेसाठी समर्पित झाल्याचे प्रतिपादन दुधनी विरक्त मठाचे मठाधिपती म. नि. प्र डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांनी व्यक्त केले.

दुधनीचे दिवंगत नगराध्यक्ष सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त आयोजित जनावरांसाठी लंपी व ग्रामस्थांसाठी कोरोना लसीकरण मोहीमेच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, सभापती प्रथमेश म्हेत्रे, महिला अध्यक्ष शितल म्हेत्रे, सुभाष परमशेट्टी, चंद्रकांत येगदी, काशिनाथ गोळळे, बसवणप्पा धल्लु, शांभवी फाऊंडेशनचे अध्यक्षा वैशालीताई म्हेत्रे, डॉ. उदय म्हेत्रे, संगम म्हेत्रे,

> दुधनी येथील स्व. सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित लसीकरण मोहिमेत लंपी लसीकरणात ५९६ जनावरांना तर कोरोनाच्या बुस्टर डोसचा ४०६ नागरिकांनी लाभ घेतला.

बालाजी म्हेत्रे, बसवराज हौदे, शंकर भांजी, चाँद नाकेदार, गुलाब खैराट, राजु म्हेत्रे, गुरुशांत उप्पीन, सचिव एस. एस. स्वामी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री व स्व. सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना सभापती प्रथमेश म्हेत्रे यांनी स्व. सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या शेतकरी संदर्भातील योगदान व विचारांची शैली आदर्श असल्याचे नमूद केले. यास अनुसरूनच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी लसीकरण शिबीर आयोजित केल्याचे सांगितले.

दरम्यान आयोजित लसीकरण मोहिमेसाठी दिवसभर दुधनीत पशुपालक, पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी संतोष जोगदे, मल्लिनाथ कोटणुर, शिवप्पा सावळसुर, शांतेश दोडमनी, शिवराज गुळगोंडा, गुरुशांतप्पा परमशेट्टी, सोमण्णा ठक्का, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. तोळीराम राठोड, डॉ. मंजुनाथ पाटील, रामा गद्दी, गुरु हबशी, शरणगौड पाटील, अशोक पादी, सिध्दाराम येगदी, शशीकांत सावळसुर, चपळगावचे सिध्दु पाटील, अशोक धोनी, चंद्रकांत कामाजी यांच्यासह विविध गावचे ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## रूपाभवानी मंदिरात भाविकांची गर्दी...



नवरात्रीनिमित्त रूपाभवानी मंदिरात रविवारी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. इन्सेटमध्ये गाभाऱ्याचा फोटो.

## गरीब-वंचित महिलांना स्वावलंबी बनवण्याचे ध्येय

✔ सुराज्य/रविकांत धनशेट्टी

युवा नेत्या शितलताई सिध्दाराम म्हेत्रे यांनी महिला सक्षमीकरणासह, शिक्षण, शेती, आरोग्य, बेरोजगार आणि रोजगार आर्थिक उन्नतीसाठी व गोर गरिबांना न्याय देण्यासाठी अक्कलकोट तालुक्यासह विधानसभा मतदारसंघात प्रयत्नशील असून, त्या आपले आजोबा स्व. सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या आशीर्वादाने, वडील माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या पावलावर पाऊल ठेऊन अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात कायापालट करण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी करत आहेत. त्यांचे शिक्षण एमबीएपर्यंत झाले असून एमआयटी पुणे येथे झाले आहे. एज्युकेशन ॲडमिनिस्ट्रेशन या विषयावर सिंबोसिस कॉलेज येथे पोस्ट ग्रॅज्युएशन देखील झाल्या आहेत. महिलांच्या प्रश्नांबद्दल त्यांच्या मनात सतत जिद्द व तळमळ आहे. ते प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न त्या करत आहेत.

महिलांना आर्थिक स्वाललंबी बनवणे हेच त्यांचे ध्येय आहे. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे स्वप्न घेऊन त्या विविध समाजकार्यांच्या माध्यमातून कष्ट घेत आहेत. महिलांचा विकास हेच आपले ध्येय असल्याचे त्या म्हणाल्या. अक्कलकोट तालुका हा सीमावर्ती भाग आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांना जोडणारा हा तालुका आहे. त्यामुळे महिलांसाठी फारसे सकारात्मक चित्र या तालुक्यात नाही. त्यामुळे महिलांच्या समस्या जाणून घेऊन त्या संदर्भात ठोस काम उभे करण्याचा प्रयत्न त्यांचा आहे. त्यासाठीच त्यांनी अम्मा सुवर्णा- लक्ष्मी फाऊंडेशनची स्थापना केलेली आहे. यातून प्रत्येक गरजू महिलेला स्वावलंबी बनवण्याची त्यांची धडपड आहे. तसेच त्यातून रोजगाराच्या संधी त्यांना उपलब्ध करून देत आहेत. आज काल ग्रामीण भागात महिलांना कायद्याची माहिती नाही. शिक्षण नाही. त्याची माहिती त्यांना करून देणे खूप गरजेचे आहे. तसा प्रयत्न आतापर्यंत कोणी केला नाही, तो केला जाईल. या संदर्भात आगामी काळात फाऊंडेशन निश्चितच चांगले काम करेल. विद्यार्थी विद्यार्थिनींना या तालुक्यामध्ये स्पर्धा परीक्षेविषयी फारसे चांगले वातावरण नाही. त्यासाठी एखादे एमपीएससी, यूपीएससी मार्गदर्शन केंद्र, पदवीधर तरुणांसाठी, आयटी फिल्डमधील तरुणांसाठी करिअर गाइडन्ससारख्या गोष्टी मनामध्ये धरून योजना आखत आहेत.



त्याचबरोबर या तालुक्यामध्ये महिला या आरोग्याकडे फारसे लक्ष देत नाहीत. ही बाब निदर्शनास आली आहे. त्यांना आरोग्याबद्दलची जाणीव करून देण्याबरोबरच या तालुक्यामध्ये एखादे चांगले हॉस्पिटल उभारण्याचा मानस म्हेत्रे परिवाराचा आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. तालुक्यात प्रत्येक गावात बचत गट आहेत. काही ठिकाणी प्रतिसादा अभावी बंद आहेत तर काही ठिकाणी अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे बंद आहेतत्या सर्व ठिकाणांची माहिती घेतलेली आहे. उदा. त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. ते आता चालू होत आहेत. एकूणच महिला बचत गटाच्या माध्यमातून जर महिलांना मदत झाली तर खऱ्या अर्थाने महिला या स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतात. त्यांना उद्योग करता येऊ शकतो. त्यांना फक्त मार्गदर्शनाची गरज असते. ते आम्ही फाऊंडेशनच्या माध्यमातून करत आहोत.

### आईची इच्छा...

वडील सतत राजकारण आणि सामाजिक कार्यात व्यस्त असल्याने आईच्या संस्कारात मी जास्त वाढले. आई वडील हेच माझे आदर्श आहेत. माझी आई स्वर्गीय सुवर्णाताई म्हेत्रे हिची मी तालुक्यातील महिलांसाठी काहीतरी करावे अशी खूप इच्छा होती ती मी पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे, असे त्या सांगतात. अक्कलकोट तालुक्यातील गावोगावी रेशन कार्ड ची अडचणी खूप मोठे आहेत तर समाधान शिबिराचेच माध्यमातून त्या आम्ही सोडवत आहोत सलगर मध्ये अशा प्रकारचा प्रयोग केलेला आहे त्या ठिकाणी अडीचशे जणांना रेशन कार्ड वाटप केले आहे हा पॅटर्न तालुका वर राबविण्यात येणार आहे. शितलताई म्हेत्रे यांनी अम्मा फाऊंडेशनच्या वतीने महिलांसाठी मैंदर्गी येथे ८० महिलांना पापडउद्योग सुरू केला. कॉर्पोरेट सेक्टर मधील जॉब नंतर राजकारणात सक्रीय महिलांना काम व शिक्षण यावर भर दिला. गावभेटीतुन समस्या समजावून घेतल्या. स्त्रियांसाठी आरोग्य शिबीर घेतले. आजार कळत नाहीत. हेल्थ तपासणी नियमित केले पाहिजे यासाठी आरोग्य शिबीराचे आयोजन केले आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांना योग्य लोकांना लाभ मिळाला पाहिजे. जे बोगस लाभार्थी आहेत त्यांनी आपला हक्क सोडला पाहिजे. बचत गटाच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती कळवतो. जिल्हा उद्योग केंद्राच्या मदतीने मैंदर्गी येथे महिलांसाठी शिलाई मशीन शिकविणे सुरू केले आहे. लाभार्थींना १५०० रूपये स्टायपंड सह प्रमाणपत्र मिळणार आहे. असे शितलताई म्हेत्रे यांनी सांगितले.